अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

जा.क्र.अम / सका - १० / २००८.
महानगरपालिका सचिव कार्यालय.
दिनांक : १२ -०२ -२००८.

अहमदनगर महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेची सुचना.

( मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूची ड चे प्रकरण - २ नियम क्र.१ (अ) अन्वये )

सभा सुचना क्रमांक १० , दिनांक २० - ०२- २००८.

प्रति,

सन्मा.श्री. / श्रीमती.....................................................

सदस्य / सदस्या, प्रभाग क्रमांक ...............

अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

महोदय / महोदया,

यांस-

याद्वारे कळविण्यांत येते की, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूची ड चे प्रकरण २ नियम क्र. १ ( अ ) अन्वये मा.महापौर यांनी अहमदनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा बुधवार दिनांक २०-०२-२००८ रोजी दुपारी १.०० वाजता महानगरपालिका सभागृहात सोबतच्या विषय पत्रिकेतील कामकाज चालविण्यांसाठी आयोजित केली आहे.

आपणांस सभेस उपस्थित राहण्यांची विनंती करण्यांत येत आहे.

नगर सचिव,
अहमदनगर महानगरपालिका.

सोबत : १. विषय पत्रिका
२. प्रस्तावाची टिप्पणी.
३ अंदाजपत्रक

अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

बुधवार दि. २०-२-२००८ रोजी दुपारी १=०० वाजता महानगरपालिका सभागृहांत होणां-या सर्वसाधारण सभेपुढील विषय पत्रिका.

--÷--

१. दुखवटयाचा प्रस्ताव.

२. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९५ अन्वये तयार करण्यांत आलेले अहमदनगर महानगरपालिकेचे सन २००७-२००८ सालचे सुधारित व सन २००८-२००९ सालचे बाबवार जमाखर्चाचे अंदाजपत्रक ( स्कुल बोर्डासह ) मा.स्थायी समितीचे शिफारशी सह मंजूरीसाठी.

३. मा.सदस्य यांचे रजेचे अर्ज.

नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका

मा.महापौर यांचे मान्यतेने.
दिनांक : १२ - ०२-२००८.
अहमदनगर.

विषय क्रमांक : २

प्रेषक : मुख्यलेखाधिकारी
प्रति : मा.नगरसचिव,

प्रस्तावना :

विषय : सन २००७-२००८ चे सुधारित व सन २००८-२००९ चे मुळ अंदाजपत्रक.

विनंती टिप्पणी देण्यात येते की, सन २००७-२००८ चे सुधारित व सन २००८-२००९ चे मुळ अंदाजपत्रकास मा.स्थायी समिती ठराव क्र.१ दि.३०-०१-२००८ अन्वये मंजुरी देण्यात आली असुन अखेर मंजुरीस्तव मा.महानगरपालिका सभेपुढे ठेवण्यास सुचित केले आहे. तरी सन २००७-२००८ चे सुधारित व सन २००८-२००९ चे मुळ अंदाजपत्रकाचा विषय मा.महानगरपालिका सभेपुढे मंजुरीस्तव सादर. सन २००७-०८ चे सुधारित व सन २००८-२००९ चे मुळ अंदाजपत्रक जोडले आहे.

मुख्यलेखाधिकारी,
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.**

**प्रस्ताव क्रमांक : २** **दि.२०-२-२००८.**

**प्रस्तावाचा विषय** - मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९५ अन्वये तयार करण्यात आलेले अहमदनगर महानगरपालिकेचे सन २००७-२००८ सालचे सुधारीत व सन २००८-२००९ सालचे बाबवार जमा खर्चाचे अंदाजपत्रक (स्कुल बोर्डासह ) मा.स्थायी समितीचे शिफारशीसह मंजुरीसाठी.

--*--

**प्रस्तावाचा मजकूर** - अहमदनगर महानगरपालिकेचे सन २००७-२००८ चे सुधारीत व सन २०००८-२००९ चे मुळ अंदाजपत्रक मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९५ नुसार तयार करणेत आले होते. ते स्थायी समिती सभेसमोर ठेवण्यात आले होते त्यास मा.स्थायी समिती ठराव क्रमांक १ दिनांक ३०/०१/२००८ अन्वये मंजुरी मिळाली असून अखेर मंजुरीस्तव मा.महानगरपालिका सभेपुढे ठेवण्यास सुचित केलेले आहे.

तरी मा.स्थायी समिती ठरावासह सोबत जोडलेले सन २००७-२००८ चे सुधारित व सन २००८-२००९ चे मुळ अंदाजपत्रक मा.महानगरपालिका सभेपुढे ठेवणेसाठी आदेशार्थ सादर.

यावर मा.उपायुक्त (कर ) यांचा अभिप्राय की, " अ " प्रस्तावित नुसार दि.२०-०२-२००८ पुर्वी मा.महासभेसमोर सन २००८-२००९ चे अंदाजपत्रक ठेवणे योग्य. मान्यतेस्तव सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की, दि.२०-२-०८ रोजी महासभेसमोर ठेवणे योग्य.

यावर मा.महापौर साहेब यांचा अभिप्राय की, महासभेपुढे ठेवणे.

अशा बाबतचा ऑफिस रिपोर्ट मा.उपायुक्त (कर) मा.आयुक्त साो, मा.महापौर साो, यांचे अभिप्रायासह पुढील निर्णयास्तव मा.सर्वसाधारणसभेपुढे ठेविला.

मा.स्थायी समिती ठराव क्रमांक १ दिनांक ३०-०१-२००८.

ठराव :- मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९५ अन्वये मा.आयुक्त साहेब यांनी तयार केलेले व स्थायी समिती कडे सादर झालेले अहमदनगर महानगरपालिकेचे सन २००७-२००८ सालचे सुधारीत व सन २००८-२००९ सालचे बाबवार अंदाजपत्रक म.न.पा. स्कुल बोर्डासह चे तसेच सन २००८-२००९ सालचे अंदाजपत्रका सोबतचे.

प्रस्ताव क्रमांक एक :- गणेशोत्सव सन २००७ या उत्सवामध्ये भाग घेतलेल्या गणेश मंडळाचे मांडव भाडे तफावतीची रक्कम परतावा करणे व पुढील काळात सन २००८-२००९ चे अर्थ संकल्पात दर सुधारीत करणे बाबत.

प्रस्ताव क्रमांक दोनः- अहमदनगर महानगरपालिकेच्या मालकीच्या सिध्दीबाग येथील जलतरण तलवाचे पोहण्याचे दराबाबत.

प्रस्ताव क्रमांक तीन :- मुंबई प्रांतिक म.न.पा अधिनियम १९४९ चे कलम ४९३ परिछेद ४ पॅरा ५चे संक्रमन कालीन तरतूदीनुसार म्यु.पल अॅक्ट खालील परवाना शुल्क मध्ये वाढ करणे बाबत.

प्रस्ताव क्रमांक चार :- अहमदनगर महानगरपालिका व कटक मंडळ भिंगार ( कॅन्टोन्मेट बोर्ड भिंगार ) यांच्यातील संयुक्त जकात कर वसुली बाबत कराराची मुदत दिनांक १/४/२००८ ते दिनांक ३१/३/२००९ या कालावधी करिता वाढविणे बाबत.असे करा दरा बाबतचे कार्यालयीन प्रस्ताव सभे समोर पाहिले.

सन २००८-२००९ सालचे बाबवार जमा खर्चाचे मुळ अंदाज पत्रकावर व सन २००८-२००९ या आगामी वर्षापासून कराचे दरामध्ये फी मध्ये वाढ, घट करणे, कटक मंडळ भिंगारचे जकात कराराची मुदत वाढविणे बाबत संबंधीत विभागाने सादर केलेल्या सविस्तर प्रस्तावावर सभे मध्ये साधक बाधक चर्चा करणेत येउन ही सभा पुढील प्रमाणे शिफारस दुरूस्त्या करीत आहे.

प्रस्ताव क्रमांक एक :-. सन २००७-२००८ सालासाठी आकारणी करण्यांत आलेला रूपये ३०/- प्रतिदिन प्रती १०० चौ. फुटासाठीचा मांडव भाडेचा दर कमी करून मांडव भाडे रक्कम गणेश मंडळास परतावा करणेस व सन २००८-२००९ या आगामी वर्षा करिता रूपये १०/- प्रती दिन प्रती १०० चौ. फूटासाठी मांडव भाडेचा दर सुधारीत करणेस मंजूरी देणेस शिफारस करण्यांत येत आहे.

प्रस्ताव क्रमांक दोन :- अहमदनगर महानगरपालिकेच्या मालकीच्या सिध्दीबाग येथील जलतरण

तलावाचे पोहण्याचे सध्याचे दर

| | |
|---|---|
| १] पुरूष व विद्यार्थी रू. १०/- | ऐवजी रूपये १५/- |
| २] पुरूष ( मासिक दर ) रू. १५०/- | ऐवजी रूपये २००/- |
| ३] स्त्रिया व विद्यार्थीनी रू. १०/- | ऐवजी रूपये १५/- |
| ४] स्त्रिया ( मासिक दर) रू. १००/- | ऐवजी रूपये १५०/- |

नव्याने प्रशिक्षण फी -रूपये ३००/-

याप्रमाणे सन २००८-२००९ सालाकरिता दर आकारणी करणेस मंजूरी देणेस शिफारस करण्यांत येत आहे.

प्रस्ताव क्रमांक तीन :- मुंबई प्रांतिक म.न.पा. अधिनियिम १९४९ कलम ४९३ परिछेद ४ पॅरा ५चे संक्रमण कालीन तरतूदीनुसार म्यु.पल ॲक्ट खालील परवाना शुल्क मध्ये कार्यालयीन प्रस्तावानुसार वाढ करून आकारणी करणेस मंजूरी देणेस शिफारस करण्यांत येत आहे.

प्रस्ताव क्रमांक चार :- अहमदनगर महानगरपालिका व कटक मंडळ भिंगार ( कॅन्टोन्मेट बोर्ड भिंगार) यांच्या तील संयुक्त जकात कर वसुली बाबत कराराची मुदत दिनांक १/४/२००८ ते दिनांक ३१/३/२००९ या कालावधी करिता वाढविणेस व रूपये एक कोटी फक्त जकात हिस्सा पोटी कॅन्टोन्मेट बोर्डास देणेस मंजूरी देणेस शिफारस करण्यांत येत आहे.

त्याच प्रमाणे मा. आयुक्त साहेब यांनी मनोगता मध्ये सुचविलेल्या योजना राबविणे कामी उपाय योजना करणेस शिफारस करण्यांत येत आहे. तसेच मा. सदस्यांनी सुचविलेली कामे अंदाजपत्रकातील संबंधीत लेखा शिर्षा मधून करणेत यावीत.

सन. २००७-२००८ चे सुधारीत व सन २००८-२००९ सालचे अंदाजपत्रकामध्ये सभेमध्ये झालेल्या सविस्तर चर्चे प्रमाणे सोबत जोडलेल्या तक्त्या मध्ये दर्शविल्या नुसार जमा व खर्चाच्या अंदाजीत रकमा कमी /जास्त करणेस, नवीन लेखा शिर्ष तयार करून त्यावर तरतूद करणेस मंजूरी देणे विषयी शिफारस करण्यांत येत आहे.

अंदाज पत्रकाच्या दोनशे प्रती छापून घेउन म.न.पा. सदस्यांना देण्यांत याव्यात, खर्च मंजूर.

वरील प्रमाणे सुचविलेल्या दुरूस्त शिफारसी सह सन २००७-२००८ सालचे सुधारीत व सन २००८-२००९ सालचे बाबवार मूळ अंदाजपत्रक महानगरपालिका शिक्षण मंडळच्या हिस्सा सह मा. महानगरपालिका सभे पुढे सादर.

--*--

| |
|---|
| **अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर** |
| **मा. स्थायी सभेने मंजुर केलेले सन २००७-२००८ चे सुधारीत अंदाजपत्रक** |
| |
| सुरवातीची शिल्लक ( दि. १/०४/२००७) ........................................ ५००००० |
| एकुण जमा ...................................................................... १०९४७६१५०० |
| सुरवातीचे शिलकेसह एकुण जमा ................................................ १०९५२६१५०० |
| एकुण खर्च .................................................................... १०९४७६०९०० |
| अखेरची अंदाजे शिल्लक ( दि. ३१/३/२००८) ...................................... ५००६०० |

| अ.नं. | लेखाशिर्ष( जमा बाजू) | मा.आयुक्त यांनी सुचविलेली तरतूद | मा.स्थायी सभेने केलेले बदल | | मा.स्थायी समितीने मंजूर केलेली तरतूद |
|---|---|---|---|---|---|
| | | | वाढ | घट | |
| **१** | **२** | **३** | **४** | **५-** | **६** |
| १. | नळधारकाकडून जमा पाणीपट्टी | ७७४००००० | २६००००० | | ८००००००० |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | **७७४०००००** | **२६०००००** | **०** | **८०००००००** |

| अ.नं | लेखाशिर्ष ( खर्च बाजू ) | मा.आयुक्त यांनी सुचविलेली तरतूद | मा.स्थायी सभेने केलेले बदल | | मा.स्थायी समितीने मंजूर केलेली तरतूद |
|---|---|---|---|---|---|
| | | | वाढ | घट | |
| **१** | **२** | **३** | **४** | **५** | **६** |
| १. | महापौर चषक स्पर्धा | २५००००० | ५००००० | | ३०००००० |
| २. | महापौर शहर विकास निधी | १०००००००० | १०००००००० | | २०००००००० |
| ३. | महापौर दुर्धररोग निवारण निधी | २००००० | २०००० | | २२०००० |
| ४. | नाका भाडे, बांधकाम, दुरूस्ती व स्थलांतर | ५००००० | ३०००००० | | ३५००००० |
| ५. | वायरमन ( मानधन ) | ० | २००००० | | २००००० |
| ६. | रस्ते दुरूस्ती ( पॅचिंग व मुरूम टाकणे) | ३२०००००० | | ३०००००० | २९०००००० |
| ७. | रस्ते कॉक्रीटीकरण | १०८००००० | | २५००००० | ८३००००० |
| ८. | नवीन गटर | १४५२२००० | | २५००००० | १२०२२००० |
| ९. | पुतळे बसविणे | १५००००० | | १०००००० | ५००००० |
| १०. | कत्तलखाना विकसीत करणे | ५००००० | | ४००००० | १००००० |
| ११. | भू- संपादन | ५००००० | | ४००००० | १००००० |
| १२. | पाणी पुरवठा सर्वेक्षण | ४००००० | | ३००००० | १००००० |
| १३. | अपंग पुनर्वसन योजना | ५००००० | | ४००००० | १००००० |
| १४. | वृक्ष गणना व नंबर टाकणे | २००००० | | १५०००० | ५०००० |
| १५. | जाहिरात खर्च | १५००००० | | ३००००० | १२००००० |
| १६. | वर्कशॉप स्थलांतर व विकसित करणे | ५००००० | | २७०००० | २३०००० |
| १७. | पल्स पोलिओ, कुटुंब कल्याण कार्यक्रम, शालेय आरोग्य शिक्षण, राष्ट्रीय कार्यक्रम | १५०००० | १००००० | | २५०००० |
| | | **७६२७२०००** | **१३८२००००** | **११२२००००** | **७८८७२०००** |

| अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर |
|---|
| **मा. स्थायी सभेने मंजुर केलेले सन २००८-२००९ चे मुळ अंदाजपत्रक** |
| |
| सुरवातीची शिल्लक ( दि. १/०४/२००८) ......................................... ५००००० |
| एकुण जमा .......................................................................... १६६०९०५००० |
| सुरवातीचे शिलकेसह एकुण जमा ............................................... १६६१४०५००० |
| एकुण खर्च ......................................................................... १६६०९०५००० |
| अखेरची अंदाजे शिल्लक ( दि. ३१/३/२००९) ....................................... ५००६०० |

| **अ.नं** | **लेखाशिर्ष( जमा बाजू)** | **मा.आयुक्त यांनी सुचविलेली तरतूद** | **मा.स्थायी सभेने केलेले बदल** | | **मा.स्थायी समितीने मंजूर केलेली तरतूद** |
|---|---|---|---|---|---|
| | | | **वाढ** | **घट** | |
| **१** | **२** | **३** | **४** | **५** | **६** |
| | | | | | |
| १. | सर्वसाधारण कर | १३००००००० | १५०००००० | | १४५०००००० |
| २. | मार्केट व स्लॉटर फी ( रस्ता बाजू फी ) | २०००००० | १०००००० | | ३०००००० |
| ३. | जाहिरात बोर्ड जागा भाडे | १०००००० | १०००००० | | २०००००० |
| ४. | अन्नभेसळ प्रतिबंधक कायद्यानुसार लायसन्स फी | २००००० | ३००००० | | ५००००० |
| ५. | गाळे भाडे | ९५००००० | ५००००० | | १००००००० |
| ६. | रक्तपेढी पासून उत्पन्न | १८००००० | २००००० | | २०००००० |
| ७. | अनधिकृत बांधकाम नियमानुकूल करणे. | ५०००००० | ५०००००० | | १००००००० |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | **१४९५०००००** | **२३००००००** | **०** | **१७२५०००००** |

| अ.नं | लेखाशिर्ष ( खर्च बाजू) | मा.आयुक्त यांनी सुचविलेली तरतुद | मा.स्थायी सभेने केलेले बदल | | मा.स्थायी समितीने मंजूर केलेली तरतुद |
|---|---|---|---|---|---|
| | | | वाढ | घट | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १. | नवीन संगणक खरेदी ( सर्व विभाग ) | ४१००००० | | १०००००० | ३१००००० |
| २. | १५० वॅट सोडीयम व्हेपर पोल टाकणे / उर्त्जा बचत दिवे बसविणे. | १०००००००| | ४०००००० | ६०००००० |
| ३. | नविन इले. पोल, स्टीट लाईट, स्पॅन फिटींग | १००००००० | | ४०००००० | ६०००००० |
| ४. | मोटार इन्श्युरन्स | ८००००० | २००००० | | १०००००० |
| ५. | वाहन भाडे / प्रतिपूर्ती (इंधना व्यतिरिक्त) | २०००००० | १०००००० | | ३०००००० |
| ६. | रस्ते कॉक्रीटीकरण | १२५००००० | | ३५००००० | ९०००००० |
| ७. | जेसीबी खरेदी / भाडयाने लावणे | ० | २०००००० | | २०००००० |
| ८. | शिक्षक दिन खर्च | ० | २५००० | | २५००० |
| ९. | रस्ते खडीकरण | १०००००००| | ६०००००० | ४०००००० |
| १०. | रस्ते डांबरीकरण व नुतनी करण | १३०००००० | | ५०००००० | ८०००००० |
| ११. | रस्ते मजबुतीकरण | १३०००००० | | ५०००००० | ८०००००० |
| १२. | नविन प्रशासकीय इमारत | १०००००००| | २५००००० | ७५००००० |
| १३. | मा. सदस्य प्रभाग विकास स्वेच्छा निधी | १९४२५००० | ३६५७५००० | | ५६०००००० |
| १४. | भू-संपादन करणे | ४०७५००० | | २०००००० | २०७५००० |
| १५. | महापौर शहर विकास निधी | ० | २०००००००| | २०००००००|
| १६. | उपमहापौर शहर विकास निधी | ० | २५००००० | | २५००००० |
| १७. | स्थायी समिती सभापती शहर विकास निधी | ० | २५००००० | | २५००००० |
| १८. | पुतळे बसविणे | १५००००० | | ५००००० | १०००००० |
| १९. | नविन गटर | ९०००००० | | १५००००० | ७५००००० |
| २०. | नविन ड्रेनेज | ९०००००० | | २०००००० | ७०००००० |
| २१. | शहरात नविन पाईप लाईन टाकणे | ९०००००० | | ४०००००० | ५०००००० |
| २२. | वसुली ( मालमत्ता कर ) रिफंड | १५००००० | | ५००००० | १०००००० |
| २३. | वर्कशॉप स्थलांतर व विकसीत करणे | १५००००० | | १०००००० | ५००००० |
| २४. | वायरमन ( मानधन ) | ० | ७००००० | | ७००००० |
| | | १४०४००००० | ६५५००००० | ४२५००००० | १६३४००००० |

<u>**चर्चा :**</u>

**विषय क्र.१ - दुखवटयाचे प्रस्ताव.**

१) मा.श्री.शंकरराव घुले - बाबा आमटे या महामानवाने कुष्ठरोग्यांना मदतीचा हात दिला व कुष्ठरोग्यांची सेवा ही ईश्वरसेवा मानून अखंड सेवा केली व जगापुढे एक मानवतेची शिकवण

ठेवली. त्यामुळे त्यांना जागतिक पुरस्कार मिळाला. त्यांचा आदर्श तरुण पिढीपुढे रहावा. बाबा आमटे यांनी केलेली सेवा ही महान सेवा आहे. म्हणून त्याबददल त्यांचे नगर शहरातील रस्त्यास नांव दयावे तसेच त्यांचे सभागृहात तैलचित्र लावावे. भारत जोडो आंदोलन, नर्मदा बचाव आंदोलन याबाबत बाबा आमटे यांना भारतरत्न पुरस्कार देण्याबाबतचा प्रस्ताव केंद्र सरकारकडे पाठवावा.

**विषय क्र.२ - अंदाजपत्रक.**

प्रथम कार्यालयीन प्रस्ताव वाचून दाखवण्यात आला.

त्यानंतर मा.सभापती, स्थायी समिती यांनी भाषण वाचून दाखविले.

त्यानंतर सभागृहात निवेदन दयावयाचे असल्यामुळे स्नेहालयचा मोर्चा आला व त्यामुळे सभागृहात मोठ्या प्रमाणात गोंधळ झाला.

१) मा.श्री.संदीप कोतकर, महापौर - वरीलप्रमाणे मोर्चेकरी सभागृहात घुसल्यामुळे या प्रशासनाचे नियंत्रण नसल्याने याबाबत चौकशीचे आदेश दिले.

त्यानंतर मा.श्री.अविनाश घुले, सभापती, स्थायी समिती यांचे भाषण पुढे चालू झाले.

२) मा.श्री.सुनिल त्रिपाठी - प्रशासनाने व स्थायी समितीचे चेअरमन यांनी जे अंदाजपत्रक सभेपुढे मांडले आहे त्याबददल त्यांचे अभिनंदन करतो. महापालिका क्षेत्रामध्ये यापूर्वी झोन निर्माण करण्यात आलेले आहेत व झोनवाईज मुख्य समस्या आहेत. त्याबाबत चर्चा करता उदा.सारसनगर भागामध्ये ज्यावेळी पुराचे पाणी घुसते त्यावेळेस प्रशासन जागे होते. गंभीर समस्याबाबत माहिती घेतली असती तर बजेट चांगले सादर करता आले असते. सारसनगर पुल एक वर्षापूर्वी याचे टेंडर पास झालेले होते. त्यावेळेस सिमेंट गोणीचा भाग १८०/- रुपये होता तो आता २३०/- झालेला आहे. सारसपुलाचे एस्टीमेट रु.२० लाख होते. ते पुन्हा वाढलेले आहे. सदर भागामध्ये टाउन प्लॅनींग रस्ता नाही. २५ लाखाचे एस्टीमेट ३५ लाखावर चाललेले आहे. याबाबत गांभिर्याने विचार करणे गरजेचे आहे.

यावर मा.महापैार यांनी श्री.त्रिपाठी यांना सांगितले की, आपण बजेटवर चर्चा करावी व सुचना असतील तर त्या मांडाव्यात. तसेच मा.श्री.सुळ, उपमहापैार यांनी बजेटबाबत सुचना करणेस सांगितले.

३) मा.श्री.अनंत जोशी - मा.आयुक्त व प्रशासनाने शिलकी अंदाजपत्रक मांडलेले आहे. त्याबददल प्रशासनाचे अभिनंदन करतो. अंदाजपत्रकामध्ये मा.आयुक्त यांनी विविध घोषणा केलेल्या आहेत. त्यावर अभ्यासू मा.नगरसेवक बोलतीलच. रु.१६३ कोटीचे अंदाजपत्रक तयार केलेले आहे. त्यास स्थायी समितीने अंतिम मंजूरी देउन व बदल सुचवून मंजुरी दिलेली आहे. अंदाजपत्रकामध्ये मा.आयुक्त यांनी चांगले मुददे मांडलेले आहेत मात्र त्यावर प्रशासकीय कारवाई होत नाही. त्यामुळे अशा बाबींवर ठोस कारवाई करणे आवश्यक आहे.

अ) वसुली विभागाचे पूर्णतः संगणकीकरण झालेले नाही. त्यामुळे ऑनलाईन पैसे भरणेची व्यवस्था होणे आवश्यक आहे.

ब) संगणक प्रशिक्षण कर्मचारी होणे आवश्यक आहे. कर्मचा-यांना संगणक प्रशिक्षण देण्याची आवश्यकता आहे.

क) घरकुल योजना म्यु.पल कर्मचारी निर्णय घ्यावा. याबाबत म्हाडा या संस्थेशी चर्चा करावी व निर्णय घ्यावा.

ड) सावेडी स्मशानभुमीसाठी रु.६५ लाखाची तरतुद करणे आवश्यक आहे. मात्र याबाबत अंदाजपत्रकामध्ये शुन्य तरतुद आहे.

इ) मंगल कार्यालय, क्रिडांगण यासाठी तरतुद करण्यात आलेली नाही. तसेच मोफत दवाखान्याची घोषणा केलेली आहे. परंतु तरतुद केलेली नाही.

फ) महापौर शहर विकास निधी २ कोटी, उपमहापौर शहर विकास निधी २५ लाख, स्थायी समिती विकास निधी २५ लाख यास मंजुरी देण्यात आलेली आहे तथापी सभागृह नेते व विरोधी पक्ष नेता याकरिता निधी तरतुद नाही. ती तरतुद करण्यात यावी. महिला व बाल कल्याण समितीलाही ५० लाखाचा निधी देण्यात आलेला आहे. विरोधी पक्ष नेते पद ख-या अर्थाने विरोधी पक्षाकडे राहील्यास त्याचा खरा उपयोग होउ शकेल.

मार्केट विभागाकडील उत्पन्न वाढ योग्य त-हेने धरण्यात आलेली आहे काय. याबाबत राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या पक्षाने मार्केटविभागाकडील भ्रष्टाचार उघड केलेला होता. याबाबत पुढे काय कारवाई झाली हे समजू शकत नाही.

अंदाजपत्रकामध्ये उत्पन्न फुगवून दाखवलेले आहे. प्रत्यक्षात आहे काय. प्रत्यक्षात उत्पन्न कमी येत आहे असे आकडेवारीवरुन दिसते.

यावर मा.महापौर यांनी खुलासा केला कि, ज्या ज्या प्रकरणी चौकशी चालू आहे त्याबाबतची यादी प्रशासनाने तयार करावी अशी सुचना संबंधीतास करतो.

४) मा.श्री.कैलास गिरवले - पोहण्याचा तलाव ज्या जिल्हा माजी सैनिक सेवा संस्थेला दिलेला आहे त्यांनी तलावावर घडलेल्या घटनांकडे दुर्लक्ष केलेले आहे. यासंदर्भात नवीन अटी व शर्ती दरवाढ करताना लावण्यात याव्यात तसेच घटना घडल्यानंतर जबाबदार कोण ते निश्चीत करावे तसेच दरवाढीस मंजुरी देण्याअगोदरच सदर जिल्हा माजी सैनिक संस्थेस नवीन दरानुसार वसुली सुरु केलेली आहे. याबाबत प्रशासनाने खुलासा करावा. यावर मेकॅ.इंजिनिअर श्री.निकम यांनी खुलासा केला कि, याबाबत योग्य कारवाई केली जाईल.

सदर संस्थेकडून २-३ लाख रुपये डिपॉझीट घ्यावे असे सुचविले.तसेच त्यांना दरवाढ कशामुळे देत आहोत हे कळत नाही. तसेच प्रस्ताव क्र.३ आरोग्य परवानाबाबत मोठया प्रमाणात उत्पन्न मिळत आहे. याबाबतची फी वाढविणे योग्य नाही.

प्रस्ताव क्र.४ जकात आकारणीबाबत वास्तविक जकात कर रदद करणेबाबत ठराव करुन शासनास कळविण्यात यावे. त्याचप्रमाणे अहमदनगर येथील कायनेटीक इंजि. लिमि. या कंपनीने दर कमी करण्याचे मागणी केलेली आहे. त्याप्रमाणे एक टक्का दर आकारण्यास मंजुरी दयावी. शहरपालिका हददीत जे जे मोकळे ओपन प्लॉट आहेत ते विकसीत करताना त्यावर बांधकाम परवानगी देताना घरपटटी पूर्ण वसुल केल्यानंतरच विकासास परवानगी दयावी.

महानगरपालिकेच्या शॉपींग सेंटरवर गाळेधारकाकडून आपण मालक म्हणून भाडे आकारणी करीत आहेत. ब-याचशा जुन्या गाळेधारकांना घरपटटी भरणेबाबत करार झालेला नाही. तथापी चुकीच्या पध्दतीने त्यांचेवर घरपटटी आकारणी केली जात आहे. त्यांना त्याबाबत परतावा दिलेला नाही. मात्र महानगरपालिकेच्या वतीने नवीन गाळेधारकांचे ॲग्रीमेंट करताना नवीन गाळेधारकांकडून घरपटटी घेण्यास हरकत नाही. मात्र जुने गाळेधारकांना घरपटटी आकारु नये.

यावर उपमहापौर यांनी सांगितले की, इतर महानगरपालिकांची माहिती घेउन सादर करावी. त्यावर श्री.गिरवले यांनी सदर बाबत चौकशी करुन कारवाई करणेबाबत सांगितले.

अनधिकृत बांधकामे - याबाबत काय कारवाई केली. अनधिकृत बांधकामे नियमित करणेबाबत दंडात्मक तरतुद केली आहे काय. मोबाईल टॉवर इ. बाबत काय कारवाई केली. यावर मा.महापौर यांनी खुलासा केला कि, वकीलांचे मतानुसार प्रस्ताव ठेवू. अनधिकृत बांधकामे,

मोबाईल टॉवर्स / केबल्स याबाबत दंडात्मक कारवाई करणे आवश्यक आहे. याबाबत प्रस्ताव पुढील सभेपुढे घेउन निर्णय घेउ.

रस्ते डांबरीकरणाबाबत तरतुद वाढविणेबाबत प्रशासनाने सुचविलेले आहे. तरतुद वाढवावी. त्याचप्रमाणे व्यायामशाळेबाबत तरतुद केलेली नाही. ती २५ लाख रु. तरतुद करावी.

५) मा.श्री.शंकरराव घुले - १६४ कोटी रुपयाचे अंदाजपत्रक महासभेपुढे स्थायी समितीने सादर केलेले आहे. अंदाजपत्रकामध्ये आपण ज्या काही तरतुदी केलेल्या आहेत व सभागृहापुढे प्रस्ताव मांडलेले आहेत. याबाबत मी अंदाजपत्रकाचे स्वागत करुन आपणास धन्यवाद देतो. चालु वर्षी महापौर विकास निधीप्रमाणेच उपमहापौर व सभापती, स्थायी समिती यांच्याही निधीची तरतुद केल्याबददल मला विशेष आनंद होत आहे. त्याचप्रमाणे सदस्यांचा वॉर्ड विकास निधी रु.१० लाख करावा. तसेच क्रिडा विभागासाठी खेळाडू मदत निधी तसेच कर्मचा-यांसाठी वैदयकीय प्रतिपूर्ती योजना इ.चांगल्या योजना अंदाजपत्रकात आहेत. तसेच आपत्कालीन निधी निर्माण केला आहे. याबददल मी आपणास धन्यवाद देतो व अभिनंदन करतो. मात्र माजी सैनिक संस्थेमार्फत चालवित असलेल्या जलतरण तलावाबाबत दरवाढ प्रस्ताव कसा येत आहे हे समजू शकत नाही.

क्रिडा विभागासाठी ५% खर्च करण्याची तरतुद आहे. तसेच खेळाडूंना ५% नोक-या देण्यात याव्यात. यापूर्वी कबडडीपटू पंकज शिरसाठ यांना रु.१.५० लाख देण्याचा प्रस्ताव मंजूर करण्यात आला होता. परंतु अदयापही सदरचे पैसे त्यांना देण्यात आलेले नाहीत. यावर मा.महापौर यांनी सांगितले की, सदरचा प्रस्ताव मा.शासनाकडे मंजुरीसाठी पाठविलेला आहे. तथापी याबाबत अहमदनगर महानगरपालिकेने नियमावली तयार केलेली नसल्याने त्यास मंजुरी मिळालेली नाही असे सांगितले. तसेच याबाबत आपण याकामी रु.१.५० लाख देउ शकतो काय अशी विचारणा केली व त्यानंतर सदरबाबत ठराव मंजूर झाल्याप्रमाणे दोन दिवसात कारवाई करावी व शासनाची मंजुरी गृहीत धरुन देण्यात यावे व शासनास तसे कळवावे असे आदेश दिले. त्यानंतर मा.उपायुक्त यांनी उपविधीबाबत खुलासा केला की, उपविधी करण्याचे काम चालु आहे. सदर श्री.पंकज शिरसाठ यांचे प्रस्तावावर कार्योत्तर मान्यता घेणेकरीता शासनाकडे पाठविण्यात येईल, असे सांगितले.

६) मा.श्री.सतिश मैड - सदर प्रस्तावास उशीर का झाला याबाबत त्यांना पैसे खरोखर देता येत नसल्यास आमच्या मानधनातून पैसे देण्यात यावेत.

७) मा.श्री.अभय आगरकर - शासनाची मंजुरी आल्यानंतर पैसे देण्यास हरकत नाही.

८) मा.श्री.शंकरराव घुले - गटविमा योजना, पिंपळगांव तलाव विकास योजना निरनिराळे प्रस्ताव मंजूर झाल्यानंतर नगरसेवक निधी खर्च झालेला आहे काय याबाबत खुलासा करावा.

९) मा.श्री.दिपक सुळ, उपमहापौर - निरनिराळया कामांवर खर्ची पडलेली रक्कम प्रत्यक्षात खर्च झालेली नसते. त्यामुळे वर्कऑर्डर दिल्यानंतरच सदरची रक्कम खर्ची टाकावी त्यामुळे शिफारशी झाल्यानंतर अंदाजपत्रकात खर्ची टाकण्यात यावी. यावर मा.महापौर यांनी मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांना पुढील आर्थिक वर्षापासून अंदाजपत्रकात काळजी घेण्याच्या सुचना दिल्या.

१०) मा.श्री.कृष्णा जाधव - महानगरपालिकेने वेळोवेळी दिलेल्या आश्वासनाप्रमाणे कामे प्रगतीपथावर आहेत. मा.स्थायी समितीने सादर केलेले अंदाजपत्रक याबददल मी सभापती, स्थायी समिती यांचे अभिनंदन करतो व चालु वर्षीचे अंदाजपत्रक खरोखरच कल्पक व सुंदर तयार केलेले आहे त्याबददल मा.महापौरांचेही अभिनंदन करतो. माझे प्रभागातील अप्पु हत्ती चौक ते दिल्लीगेट या रस्त्याचे कामास सुरुवात झालेली नाही. ती त्वरेने करण्यात यावी.

शहरातील अतिक्रमणाबाबत मार्कींग करुन कारवाई करावी. जकातीबाबत मागे सुचविल्याप्रमाणे बांगडयावरील जकात अदयाप माफ झालेली नाही. ब-याच ठिकाणी घरपटटी आकारणी चुकीची झालेली आहे. माझ्या प्रभागातील व्यायामशाळेला रु.२१०० घरपटटी आकारली

आहे ती अत्यंत जास्त आहे. सदरची तालीम एकतर मनपाकडे वर्ग करुन घेण्यात यावी. व्यायामशाळेच्या साहित्याची अंदाजपत्रकात तरतुद करावी. सदस्यांना वॉर्ड विकास निधी रु.५ लाखापेक्षा जास्त न देता या निधीतून शहरामध्ये मोठे एक भरीव योजना आखावी व शहराचा विकास करावा. जकातीबाबत ठेका न काढता मनपाच्या अनुभवी कर्मचा-यांकडून जकात वसुली करावी.

११) मा.श्री.भगवान फुलसौंदर - अहमदनगर शहरामध्ये ५ राज्यरस्ते येउन मिळतात. सक्कर चौक ते अप्पु चौक या रस्त्याचा विकास होणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे मनमाड रस्त्यावर अपघात होतात. याला पर्यायी रस्ते उपलब्ध होउ शकतील. शहरामध्ये पूरनियंत्रण रेषा सीना नदीच्या बाजुने रस्ता तयार केल्यास पर्यायी रस्ता होउ शकेल. महापालिकेला उत्पन्न मिळू शकेल. महापालिकेने विभागीय कार्यालय केलेले आहे. त्यांना जादा अधिकार देणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे मंगल कार्यालय व बगिचे करण्यात यावेत. तसेच भाजी मार्केट, नेहरु मार्केट विकसीत करावेत. याबाबत निवीदा काढून ४-४ वर्षे झालेले आहेत. बुरुडगांव भाजी मार्केट जागेचा विकास करुन तेथेही व्यापारी संकुल होउ शकते.

शहर बससेवाबाबत अंदाजपत्रकात तरतुद करावी.

मा.महापौर यांनी सांगितले की, विभागीय कार्यालयांना यापूर्वीच रु.५ हजार खर्चाचे अधिकार देण्यात आले आहेत त्यामुळे किरकोळ खर्च ते करु शकतात. तसेच उपायुक्त व सीटी इंजिनिअर यांचे खर्चाचे अधिकार वाढविणेचे सुचविले. तसेच महापालिकेच्या प्रत्येक प्रकल्पावर इंजिनिअर ठेवण्यात यावा असे सुचविले.

त्यानंतर मा.श्री.फुलसौंदर यांनी सुचविले कि शहर बससेवा वाढण्याच्या दृष्टीने नगर शहर दर्शन बससेवा सुरु केल्यास त्यातूनही उत्पन्न मिळू शकते. सारसनगर विकासासाठी बजेट तयार करावे. आनंदधाम येथील रस्तयाबाबत अंदाजपत्रकात विषय घेण्यात यावा.

महापालिकेला जकात उत्पन्नाशिवाय पर्याय नाही. याबाबत तरतुद अंदाजपत्रकात करणे आवश्यक आहे.

१२) मा.श्री.अभय आगरकर - अहमदनगर महानगरपालिकेचे सन २००७-२००८ व २००८-०९ चे अंदाजपत्रक पाहिले असता त्याचा ताळमेळ घेतलेला नाही. चालु वर्षी ज्या प्रोव्हीजन केलेल्या होत्या त्यातील उपलब्ध पूर्ण खर्च झालेले आहे किंवा नाही त्याचा पडताळा मुलतः करणे आवश्यक होते. काय काय कामे केली व सन २००८-०९ मध्ये करावयाच्या कामाबाबतचे ठळक मुददे विचारात घेतले असता असे दिसून येते कि, शहराला वैभव प्राप्त करुन देणेबाबतचे प्रयत्न चालू असताना 'प्लॅन्स आर गुड बट प्लॅनींग इज बॅड' असे म्हणावेसे वाटते. तेव्हा सर्व खात्यांनी वेळेचे नियोजन करणे आवश्यक आहे.

बांधकाम व इतर विभागाकडील खात्यांचे अंदाजपत्रकीय हेडचे अवलोकन केले असता ब-याचशा हेडवर अपेक्षीत खर्च झालेला नाही हे दुर्देव आहे. याला आपण सगळेच जबाबदार आहोत. वरील १८ उदाहरणादाखल बाबी दिलेल्या आहेत. याबाबत ३१ मार्च अखेर खर्च होईल काय, झाल्यास किती खर्च होईल, याबाबत काय प्लॅन्स आहेत. याकरिता नागरिक, लोक प्रतिनिधी व प्रशासन या तिघांचे सहकार्य अपेक्षीत आहे. रिॲप्रोप्रिएशनचेवेळी हे मुददे का विचारात घेतले जात नाहीत? बजेटपुढील काळात खर्च होणार आहे काय. कामे पूर्णत्वास जातील असा विचार केला गेला पाहिजे. कामाचे ॲसेसमेंट करण्यात यावे. त्याशिवाय बजेट मॉनीटरी कमिटी तयार करण्यात यावी. स्पर्धा परिक्षा केंद्राकरिता रु.५ लाखाची तरतुद करण्यात यावी. त्याकरिता लायब्ररी व अभ्यासिका तसेच वायफाय योजना तयार करावी. AUDA या हेडवर काहीतरी टोकन तरतुद करावी. खोकर नालाबाबत अंदाजपत्रकात तरतुद करण्यात यावी. अहमदनगर शहरामध्ये भाजी

विक्रेते रस्त्यावर बसून भाजीची विक्री करतात. त्यांना मार्केट नसल्याने याबाबत काय प्रोव्हीजन केलेली आहे.

आता सन २००८-०९ चे बजेट फुगविलेले बजेट आहे, असा माझा स्पष्ट आरोप आहे.

कोणकोणती कामे करावयाची याची स्पष्ट यादी मांडली गेली पाहिजे व त्यावर बजेट मंजूर करुन घेतले पाहिजे. जमा बाजू पाहिली असता सन २००८ मध्ये फक्त ३० टक्के वसुल झालेला दिसतो. शिक्षण मंडळाबाबत भूमिका स्पष्ट झालेली नाही.

१३) मा.श्री.मुदस्सर शेख - आरसीएच अंतर्गत दवाखान्याकरिता अंदाजपत्रकात तरतुद नाही. नागरिकांना आरोग्य विषयक सेवासुविधा मिळाव्यात. दवाखान्याकरिता भाडेतत्वावर जागा घेण्यात यावी. बॉम्बे हॉस्पीटलचा प्रस्ताव आहे. आदेश घ्यावेत.

घरपटटीकरिता मुकुंदनगर झोन नं.३ मधून झोन नं.४ मध्ये टाकण्यात यावा.

१४) मा.श्री.अशोक कानडे - महानगरपालिकेच्या पंचवार्षिक नुसार हे पालिकेचे शेवटचे अंदाजपत्रक आहे. अंदाजपत्रकावरील चर्चेनुसार गोष्टी होत नाहीत असे लक्षात येते. अंदाजपत्रकावरील ज्या बाबीवर खर्चाच्या तरतुदी केलेल्या आहेत त्याचे नियोजन होते काय. मागील नमूद केलेले कामकाज मनपाकडून होत नाही असे वाटते.

१५) मा.श्री.दिप चव्हाण - सभ ागृहामध्ये बैठकीस आवश्यक ते गणपुर्ती नसल्याचे निदर्शनास आणून देतो.

सभागृहात गणपुर्ती नसल्याचे निदर्शनास आल्यामुळे मा.महापौर यांनी सभा १० मिनीटे तहकूब करीत असल्याचे सांगितले. त्यानंतर दुपारी ५.३५ वाजता सभा पुन्हा सुरु झाली.

१६) मा.श्री.अशोक कानडे - मा.आगरकर यांनी जे विचार व्यक्त केलेले आहेत. त्यामध्ये मागील अंदाजपत्रकातील कोणतीही कामे झालेली नाहीत. २-२ वर्षे प्रलंबीत आहेत याची जाणीव होत आहे. त्यामध्ये ६ रस्त्याची कामे असतील त्याचप्रमाणे गांधीनगर रस्त्याच्या कामाबाबत एक ऐतिहासिक बाब ठरलेली आहे. आर्थिक बाजू पहात असताना विकासाचा ताळमेळ साधला जातो काय. जमा बाजूकडील घरपटटी वसुली, रस्ता बाजु फी याबाबत आकडेवारी पाहिली असता मनपा अधोगतीकडे जात आहे असे दिसते. याबाबत प्रशासन कमी पडत नाही का असा माझा सवाल आहे. प्रत्येक जमा बाजुमध्ये घोळ दिसतो. ३-४ वर्षाचा आलेख पाहिला असता जमेमध्ये वाढ न होता ती घटत आहे असेच दिसते. याबाबत संबंधीतांना कधी साधी शो-कॉज नोटीस काढलेली नाही. जमा बाजुबाबत कुठलेही नियोजन होत नाही. पाणीपटटी मागील वर्षी जेवढी आहे तेवढी वसुल व्हावयास पाहिजे. त्यामध्ये घोळ असल्यामुळे संबंधीत विभागाला जाब विचारणा होईल काय? यामध्ये काय दोष आहेत. त्यामुळे वसुलीमध्ये २-२ कोटीची वाढ धरावी. संकलीत करामध्ये ओपन प्लॉटवर नगररचना खात्याकडून वसुली करावी. मनपाचे गाळेभाडे वसुलीमध्ये ठोस निर्णय घेउन जादा वसुली होउ शकेल तसेच त्यावर आकारण्यात आलेला संकलीत कर माफ करणेबाबत निर्णय घेण्यात यावा.

अंतर्गत सुधारणा निधीमधून स्ट्रीट लाईट, कंम्पौंड, रस्ते इ. करु शकतात. त्याबाबतची वसुली करावी. सदरची कामे बिल्डरकडून केली जात नाहीत. त्याचा भार नगरपालिकेच्या अंदाजपत्रकावर पडतो. विकासभारामध्ये अडीच कोटीची रक्कम जमा आहे. याबाबत ३-३ प्रस्ताव एकत्र करुन तातडीने डिझाईन करुन कार्यवाही करण्यात यावी. अंतर्गत सुधारणा बाबतची किरकोळ कामे निविदा प्रक्रियेमध्ये घेउ नयेत.

अतिक्रमणाबाबत मागील वेळी चर्चा होउनही कार्यवाही झालेली नाही. गांधीनगर रस्त्याबाबत ६० मीटर अथवा ३० मीटर बाबत प्रशासन काही खुलासा करील काय? गटई कामगाराकडून रस्ता बाजू फी वसुल केली जात नाही. पंकज शिरसाठ याला ठरावानुसार मंजूर

केलेले अनुदान अदयाप दिलेले नाही. हददवाढीतील ५०० पोल बसविणेचे एस्टीमेट असताना त्याकरिता रु.९० लाखाची तरतुद केलेली आहे. ती वाढविण्यात यावी.

जलतरण तलाव याबाबत माजी सैनिक संघटना कोर्टामध्ये गेलेली आहे. मात्र संस्थेला दरवाढ मात्र दिलेली आहे.

ग्रंथालयासाठी व साहित्य संमेलनासाठी अंदाजपत्रकात तरतुद करण्यात यावी.

१७) मा.श्री.सुनिल कोतकर - तालमीसाठी महिला कोच नेमणेबाबत विचार करण्यात यावा. तसेच जकातीचे संदर्भात केडगांव इंडस्ट्रीअल इस्टेट येथील कारखान्यांना सवलतीचे दर आकारावेत.

१८) मा.श्री.सुनिल त्रिपाठी - औदयोगिक वसाहतीमध्ये जवळजवळ २०० ते २५० कारखानदार आहेत. या लहान कारखान्यांचे युनिटमध्ये लेबर चार्जेसवर काम घेउन कामे केली जातात व त्यावर एक टक्का आकारणी केली जाते. परंतु यामध्ये मालात काही बदल झाल्यास यावर ३ टक्क्यापर्यंत जकातीची आकारणी केली जाते. त्यामुळे सदर कारखान्यांच्या नफयावर परिणाम होउन उत्पन्नात घट येते. त्यामुळे सदर उदयोजकांना सवलत दिल्यास त्यांचेही उत्पन्न वाढून महापालिकेचा फायदा होउ शकतो. यावर उपायुक्त यांनी जकातीबाबत सभागृहात खुलासा केला. त्यावर श्री.त्रिपाठी यांनी सांगितले, अशाप्रकारे सवलत देणेबाबत महापालिकेचा ठराव घेउन शासनास पाठवावा.

१९) मा.श्री.नामदेव पवार, विरोधी पक्ष नेता - महानगरपालिकेने नागरिकांना रस्ते, आरोग्य, पिण्याचे पाणी इ.मुलभूत सोयी देणे आवश्यक असताना निरनिराळया योजना मनपा प्रस्तावीत करीत असते. रस्त्यांच्या निविदा काढल्या जातात परंतु रस्त्यांचे कामे पूर्ण झालेली नाहीत. पदाधिकारी आणि अधिकारी यांचा कामामध्ये समन्वय नसल्यामुळे शहराचा विकास झालेला नाही, असे दिसून येते. अशा त-हेने समन्वय राहीला नाही तर पुढील ७-८ महिन्यात झालेल्या कामाबाबत नागरिकांसमोर दिसून येणार नाही. मागील ४ वर्षामध्ये महापालिका स्थापन झाल्यापासून शहराचा नियोजनबध्द विकास होईल, असे वाटले होते. परंतु खरोखर अशाप्रकारे विकास झाला नाही याबददल खेद वाटतो. यापुढे विनंती करतो की, येथून पुढे तरी आपण शहराचे काही देणे लागतो व आपले काहीतरी दायित्व आहे, या भावनेतून प्रामाणीकपणे शहरात काहीतरी केले पाहिजे. उदा.भाजी मंडईचा प्रश्न आहे. नाटयगृह, रंगभवन, अतिक्रमणाचे प्रश्न इ.

शहरामध्ये एकही मोठी वास्तु उभी राहीलेली नाही व समन्वय असता तर आपण हे करु शकलो असतो. नगरसेवक निधीमधून तरी चांगल्या वास्तु उभ्या कराव्यात. महानगरपालिकेचा एखादा चांगला दवाखाना असावा. महानगरपालिकेच्या अनेक जागा आहेत. त्यामध्ये पार्किंग ठेवल्यास चांगले उत्पन्न मिळू शकेल. उदा.जुन्या सिव्हील हॉस्पीटलची जागा ताब्यात घेउन त्यावर विकास करुन कार्यवाही करता येईल. महानगरपालिकेकडून आम्ही दरमहा रु.४००० मानधन घेतले आहे. शहराचा विकास न झाल्यामुळे याबददल आम्हाला खेद व लाज वाटते. कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना येथे मेंटेनन्सची कामे का होत नाहीत. यावर मा.महापौर यांनी खुलासा केला की, दुर्दैवाने याबाबत फॉलोअप होत नाही असे दिसते.

२०) मा.श्री.भाउसाहेब उडाणशिवे - शहरातील कागद,काच,पत्रा गोळा करणारे जे ५००-६०० खाजगी कर्मचारी आहेत हे अहमदनगर शहरातील जवळजवळ २०% कचरा उचलणचे काम करीत असतात. त्यांच्याकरीता महापालिकेने विम्याची तरतुद करावी.

२१) मा.श्री.दीप चव्हाण - चालु वर्षी अहमदनगर महापालिकेचे अंदाजपत्रक १५२ कोटी रुपयाचे असताना प्रत्यक्षात ते १०९ कोटी रुपयावर आणलेले आहे. मागील वर्षीच्या अंदाजपत्रकातील प्रस्ताव व त्यावेळी केलेल्या घोषणा चालू वर्षी वगळून टाकलेल्या आहेत. बीओटी खालील प्रस्ताव, काही प्रस्ताव पैसे नाहीत म्हणून प्रलंबीत आहेत. अशा प्रकारे प्रस्ताव

मागे का पडलेले आहेत? उत्पन्नामध्ये पाणीपटटी/घरपटटी, विकास भार, जकात कर, शॉपींग सेंटर गाळे इ. जमेच्या बाजूला असतानाही १५२ कोटी रुपयावरुन अंदाजपत्रक १०९ कोटी रुपयावर का आले याचा खुलासा करण्यात यावा. बजेट करताना कमीत कमी १० ते जास्तीत जास्त २०% कमी जास्त अपेक्षीत धरावे व अंदाजपत्रकात अ, ब व क मध्ये सादर करणेबाबत तरतुद आहे. त्यामुळे अंदाजपत्रक रु.१०९ कोटी झालेले आहे. पान नं.३६ वर सन २००७-०८ चे सुधारीत अंदाजपत्रक मांडलेले आहे त्याबाबतचा खुलासा करावा.

याबाबत मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी खुलासा सादर केला.

वसुली विभागाकडील मागील वर्षी ८० हजार कुळे असताना १४ कोटी डिमांड कशाच्या आधारे काढण्यात आली आहे याचा खुलासा करावा. यबाबत अपेक्षीत उत्पन्न धरावयास पाहिजे. बीओटी खालील सर्व प्रकारचे प्रस्ताव उडालेले आहेत. बजेटमध्ये ठरल्याप्रमाणे कामे होणार आहेत काय व तसे असल्याचे वास्तव चित्र दिसून येत नाही.

शिक्षणाबाबत काय तरतुद केलेली आहे. नगरसेवक निधी बाबत शासकीय जीआर प्रमाणे दोन टक्के खर्च व्हावयास पाहिजे परंतु त्यावर १० ते १५ टक्के खर्च होत आहे. मागील वर्षीचे बजेट १५२ कोटी रुपयावरुन १०९ कोटी रुपयावर आले ही दुर्देवाची बाब आहे. महानगरपालिका फंडातून बरीचशी कामे कमी झालेली आहेत. मात्र जी कामे झालेली आहेत ती दलित वस्ती निधी व शासकीय निधी यामधूनच झालेली आहेत. सानुग्रह अनुदान इ. खरी प्रोव्हीजन करणे आवश्यक आहे. गुंठेवारी प्रोव्हीजन वाढविणे.

८० हजार कुळे असताना १४ कोटी रुपये वसुल होणार आहे काय. रस्ता बाजू फी मध्ये १० कोटी रुपयाचा वसुल होणार आहे काय? शेतमालावर जकात माफ असताना केडगांव येथील शेतक-यांना रस्ता बाजू फी माफ करावी असे सुचविले. याबाबत वसुली होत नसल्याबददलची ऑफिस नोट आहे.

डीपीआरमध्ये महापालिका काय काय करणार आहे याबाबत ठराव काय झालेला आहे? डीपीआरबाबत महानगरपालिकेचा ठराव झालेला नाही. शासनाकडून डायरेक्शन होत्या त्याबाबत महापालिका सभागृह अंधारात ठेवले गेलेले आहे. यावर मा.महापौर यांनी सांगितले की, हा मुददा रास्त आहे. तसेच १२व्या वित्त आयोगाच्या निधीमधून महापालिका मोटर व्हेईकल गाडया घेणार आहे त्यासाठी ड्रायव्हर कोठून आणणार आहेत. डीपीआर बाबत सदस्याच्या भावना तिव्र आहेत, याची नोंद घेत आहोत असे प्रभारी आयुक्त यांनी सांगितले.

डीपीआरबाबत सभागृहाला अंधारात ठेवून का पाठविले गेले आहे याबाबत खुलासा करावा.

२२) मा.श्री.बहिरनाथ वाकळे - डीपीआर मध्ये प्रॉपर्टी धारकांवर दरमहा रु.५० ची आकारणी करणेत आलेली आहे. याबाबत दरवर्षी रु.६००/- प्रत्येक प्रॉपर्टी धारकाला भरावे लागणार आहे. याबाबत पूर्ण सभागृह अंधारात आहे. सावेडी भागामध्ये सिटी सर्व्हे करणेकरिता अंदाजपत्रकामध्ये रु.५ लाखाची तरतुद करावी असे सांगितले.

२३) मा.श्री.भानुदास कोतकर - डीपीआरचा विषय १४ कोट रुपये तरतुदीचा आहे. शासनाच्या मार्गदर्शनानुसार डीपीआर ठरावीक वेळेत तयार होणे आवश्यक होते व त्यामध्ये ठरावीक मुदत असल्यामुळे व शेवटचीच मुदत असल्यामुळे मा.आयुक्त यांनी सदरबाबत सर्व फॉर्मलीटीज पूर्ण करुन शासनास पाठविलेल्या आहेत. महानगरपालिकेस यामध्ये नंतर काही बदल करावयाचे असल्यास त्यात बदल करुन तशा प्रकारे प्रस्ताव आपण शासनास पाठवू शकतो. त्यामुळे याबाबत मा.महापौर यांनाही माहिती मिळू शकते. तरी डीपीआर बाबतचा ठराव मंजूर करण्यास हरकत नाही असे सुचविले. याबाबत महापालिका जो काही बदल करेल तो मंजूर होउ शकतो. मात्र यामध्ये प्रत्येक मालमत्ताधारकास रु.६००/- ची आकारणी करणेत आलेली आहे.

त्यास विरोध करुन नामंजूर असल्याचा ठराव करावा, असे सांगितले. त्यामध्ये काही अटी घालून व विचार करुन पुनश्च प्रस्ताव शासनाकडे सादर करावा.

यावर उपायुक्त (कर) यांनी खुलासा केला की, डीपीआर तातडीने तयार करुन शासनाकडे पाठविण्याचा अधिकार मा.आयुक्त साहेब यांना होता. त्याप्रमाणे त्यांनी विहीत मुदतीत शासनास सादर केलेला आहे. रु.६००/- मालमत्ता धारकास आकारणी करणेस विरोध असल्यास तशा अर्थाचा ठराव करावा व याबाबत मा.आयुक्त यांचेशीही चर्चा करावी असे सांगितले.

नंतर स्कूल बोर्डाचे अंदाजपत्रकावर चर्चा झाली.

मा.श्री.भानुदास कोतकर - केडगांव, बोल्हेगांव इ. झोन घरपटटीकरिता क्र.३ मधून क्र.४ मध्ये टाकावेत. असा ठराव करणेबाबत सुचविले. तथापी यावर नगररचनाकार श्री.धोंगडे यांनी खुलासा केला की, यापूर्वी रिव्हीजन होउन व झोन होउन कराची आकारणी केलेली आहे. झोन बदलावयाचा असल्यास कोर्टाचा निर्णय घ्यावा लागेल. व त्यानंतर रिव्हीजन करावे लागेल. व पुढील वर्षी आपण रिव्हीजन करु शकतो. तसेच उपायुक्त (सा) यांनी कोर्ट मॅटर असल्याने याबाबत पुढील वर्षी रिव्हीजन करु शकतो.

२४) मा.श्री.मिलिंद गंधे - ग्लोबल वॉर्मिंग मध्ये तापमान वाढत आहे. पर्यावरणाची हानी होत आहे. पर्यावरण राखण्यासाठी अपारंपारीक उर्जेचा वापर करणे अपरिहार्य आहे. तसेच वृक्षारोपणा सारखे प्रकल्प राबविणे आवश्यक आहे. पर्यावरण,ऑक्सिजन, प्राणवायूची निर्मिती केली पाहिजे. तसेच बायोगॅस निर्मित , सौरउर्जा तसेच रेनवॉटर हार्वेस्टिंग पैकी ज्या योजना इमारतीत वापरतात त्यांना महानगरपालिका प्रॉपर्टी टॅक्स १० टक्के सूट पाच वर्षाकरीता देण्यांत यावी. ही सुट जास्तीत जास्त रू.१००० /- असावी. तसेच कार्बन क्रेडीट ट्रेडिंग अधिकारा बाबतचे फॉर्म महानगरपालिकेकडे भरून घेण्यांत यावे.

२५) मा.श्री.दीप चव्हाण - रिव्हीजनबाबत महानगरपालिका कायदयामध्ये तरतुद नाही असे सांगितले.

**।। मा.महापौर साहेब यांचे मनोगत ।।**

आई जगदंबेच्या आशिर्वादाने तसेच आदरणीय व परमश्रध्देय सोनीयाजी गांधी अध्यक्ष अखिल भारतीय कॉग्रेस या देशाचे पंतप्रधान डॉ.मनमोहनजी सिंग तसेच भारताचे कृषि मंत्री मा.ना.श्री.शरदरावजी पवार साहेब, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री श्री.विलासरावजी देशमुख साहेब मा.ना.श्री. बाळासाहेबजी थोरात,कृषि मंत्री महाराष्ट्र शासन तसेच या जिल्हयाचे पालकत्व करणारे मा.ना.दिलीपरावजी वळसे पाटील उच्च व तंत्र शिक्षण मंत्री, मा.आ.श्री.गोविंदरावजी आदिक, मा.श्री. दादाभाउ कळमकर, जिल्हाध्यक्ष राष्ट्रवादी कॉग्रेस या सर्वाचे मार्गदर्शन व सहकार्य मला कामकाज करतांना लाभत आहे. अहमदनगर महानगरपालिकेचा पुढील वर्षाचे म्हणजे सन २००८ -०९ चे मुळ अंदाजपत्रक घेवून मी आपल्यासमोर येत आहे. अहमदनगर शहर "महानगर" होण्याच्या दृष्टिने प्रत्यक्ष प्रक्रिया सुरू झाली आहे . १८५४ ते २००४ म्हणजे १५४ वर्षाच्या कालावधीत माळीवाडा वेस ते दिल्लीगेट ही सीमारेषा असणा-या या छोटया गावठाणाचे रूपांतर मोठया शहरात व आता पर्यायाने " महानगरात " होण्याची प्रत्यक्ष प्रक्रीया जोमाने सुरू झाली असून नागरी सुविधा देणारी काही विकास कामे पूर्ण झाली असून अनेक कामे पूर्ण होण्याच्या मार्गावर आहेत.तसेच सन २००८-०९ या आर्थिक वर्षा मध्ये जास्तीत जास्त कामे पूर्ण करून नागरी सुविधा देण्याचा मानस आहे. यामध्ये महानगरपालिका प्रशासकीय इमारत, कोठी ते यश पॅलेश पर्यत ड्रेनेज लाईन, हायमास्ट द्वारे चौक सुशोभिकरण करणे. सुलभ शौचालय इमारतीचे निर्माण, आगरकर मळा येथील पाण्याची टाकीचे प्रलंबित काम पूर्ण करून परिसर नागरिकांना पुरेशा दाबाने पाणी उपलब्ध

होत आहे. सिध्दार्थ नगर येथील पाण्याची टाकी, समर्थ नगर येथील पाण्याची टाकी या कामाचे देखील शुभारंभ करण्यात आले असून त्याबाबत कार्यवाही सुरू आहे.

- यू.आय.डी.एस.एस.एम.टी. योजना पूर्णत्वाकडे असून या संदर्भा मध्ये मा.राज्य शासनाकडून मा.केंद्रशासन यांचेकडे प्रस्ताव सादर करणेत आलेला असून मा.केंद्र शासन व मा.राज्य शासन यांचेकडे पाठपुरावा सुरू असून लवकरच योजनेस मान्यता मिळणार असून त्याचा निधीही प्राप्त होणार आहे. त्यामध्ये पाणी पुरवठा योजना, भुयारी गटार योजना राबविणे आदी प्रस्ताव आहेत.

- केंद्रीय १२ वा वित्त आयोगातून सारसनगर येथे पुल बांधणे तसेच काटवन खंडोबा येथे पुल बांधणे या बाबतचे कार्यालयीन सोपास्कार पूर्ण होत आले असून लवकरच काम सुरू होणेची प्रक्रीया होईल यासाठी सार्वजनिक बांधकाम विभाग अहमदनगर यांचेकडे रक्कम वर्ग करणेत आली आहे.

- नाटयगृह उभारणी शहराच्या सांस्कृतिक नाटय क्षेत्रात वाढ व्हावी या करिता नाटयगृह उभारणी बाबत प्रक्रीया सुरू असून अलिकडेच नामांकित कंपनी यांचेशी चर्चा झालेली आहे.

- <u>एकात्मिक गृह निर्माण झोपडपट्टी विकास कार्यक्रम</u> - मा.शासनाच्या या कार्यक्रमा अंतर्गत सुमारे १००० घरकुले बांधण्याची योजना आहे. यादृष्टिने अघोषित झोपडपट्टी तसेच परिसर याबाबत निरनिराळया प्रभागातील अशा स्वरूपाच्या भागांचा सर्वे करून त्यांना घोषित स्लम जाहिर करण्याच्या दृष्टिने मा.शासन स्तरावर कार्यवाही व्हावी याकरिता अलिकडेच महासभेपुढे ठराव पारित करण्यात आलेला असून अशा भागांना जास्तीत जास्त नागरि सुविधा मा.शासनाच्या योजना याचा लाभ घेता यावा यादृष्टिने प्रशासन स्तरावर कार्यवाही सुरू आहे.

- संभाजी महाराज पुतळा - प्रोफेसर कॉलनी येथील चौकामध्ये संभाजी महाराज यांचा पुतळा बसविणे बाबत कार्यालयीन कार्यवाही पूर्ण झाली असून लवकरच प्रत्यक्ष कामास सुरूवात होईल.

- मुळा डॅम ते वसंत टेकडी सुधारित पाणी योजना रक्कम रू. ११० कोटी प्रकल्प राबविण्याच्या दृष्टिने कार्यवाही सुरू असून त्याचप्रमाणे सावेडी भुयारी गटार योजना ७० कोटी रुपयाचा प्रस्ताव तयार झाला असुन दोन्ही प्रस्ताव मान्यतेसाठी ठेवण्यात आले असुन केडगांव पाणीयोजना ३१ कोटी रुपये मंजुर झाले असुन त्याबाबतचा निधी लवकरच उपलब्ध होणार आहे.येत्या आर्थिक वर्षात त्यास गती देण्यात येणार आहे.

- बी.ओ.टी. तत्वावर खत प्रकल्प ( सुमारे १० कोटी रूपये ) खर्चाचा प्रकल्प राबविणे बाबत कार्यवाही सुरू आहे.

- महापौर चषक कुस्ती स्पर्धेचे आयोजन सालाबादाप्रमाणे करण्यात आलेले असून राज्यस्तरीय क्रिडाक्षेत्रातील विविध खेळांच्या राज्यस्तरीय स्पर्धा भरविण्याचा मानस असुन त्यातुन क्रिडा क्षेत्रातील सर्व खेळांना प्राधान्य देण्याचा प्रयत्न आहे.

अहमदनगर शहरामध्ये सक्षम दृष्टिने व दिर्घ कालीन परिणाम करणा-या नागरि उपयोगी योजना पूर्णत्वाकडे नेण्याचा मानस आहे. परंतु या कामाची जबाबदारी पार पाडताना आपल्या सर्वांचे सहकार्य तसेच मार्गदर्शन व मौलीक सुचना विचारात घेवून कार्यवाही करणार आहे. मला माझे कामकाजात आजतागायत आपण केलेले बहुमोल सहकार्या बद्दल मी आपला आभारी आहे. यापुढील काळात असेच सहकार्य लाभेल या अपेक्षेसह . . . जय हिंद ,जय महाराष्ट्र.

**ठराव -**

ऑफिस रिपोर्ट - ऑफिस रिपोर्ट व मा.स्थायी समितीने केलेल्या शिफारसी व सभेमध्ये झालेल्या साधक बाधक चर्चेनुसार अंदाजपत्रक उत्पन्नाचे स्त्रोत व भविष्यामध्ये शहरवासियांकरिता कामाचे नियोजन करून ते पूर्णत्वास न्यावयाचे दृष्टिने ही सभा सन २००७ - ०८ चे सुधारित व सन २००८-०९ चे मुळ अंदाजपत्रकास कर व दरासह तसेच मनपा स्कूल बोर्डासह व पुढील निर्णयासह मंजूरी देण्यात येत आहे.

१) सर्वसाधारण करात १.५० कोटी तरतुद वाढविणेत यावी. मालमत्ता धारकांची संख्या वाढल्यामुळे संकलित करात सन २००८-२००९ मध्ये १.५० कोटीने वाढ होउ्र शकेल. त्यादृष्टीने वसुली विभागाने संकलीत कर जास्त प्रमाणात वसुल होईल याबाबत दक्षता घ्यावी.

२) अहमदनगर अर्बन डेव्हलपमेंट ॲथॉरिटी अंतर्गत राज्यातील इतर मनपांना भेटी देउ्न माहिती व मार्गदर्शन मिळविणेकामी अंदाजपत्रकात खर्च बाजुस रु.५०,०००/- ची तरतुद करण्यात यावी.

३) अनाधिकृत बांधकाम नियमानुसार करणे या प्रकरणामधून महानगरपालिकेस मिळणारे अपेक्षित उत्पन्न सुचविलेली तरतूद ५० लक्ष रूपयांनी वाढविणेत यावी.

४) नविन इलेक्ट्रीक पोल, स्ट्रीट लाईट व स्पॅन फिटिंगसाठी अंदाजपत्रकात रु.३०.०० लाख इतकी तरतुद वाढविण्यात यावी. उपनगरांचा वाढता विस्तार लक्षात घेता सदर तरतुद वाढविणेत यावी.

५) शहरामध्ये बांधकाम व्यावसायीक व विकसक भूखंडाचा नागरी वसाहतीच्या उपयोगाचे नियोजन करताना पिण्याचे पाईप लाईन टाकतांना पी.व्ही.सी. पाईप ऐवजी गॅल्वनाईज पाईप टाकणे बाबत कार्यवाही बंधनकारक आहे असे असताना त्याची परिणामकारक अंमलबजावणी होताना दिसत नाही याबाबत प्रशासनाने , संबंधीत विभागाने याबाबत दक्षता घेणेत यावी.

६) भविष्यामध्ये शासनाने जकात बंद केल्यास पारगमन फी / प्रवेश फी या माध्यमातून उत्पन्नाचे स्त्रोत उभारणेत यावेत याकार्यवाहीस देखील ही सभा मान्यता देत आहे.

७) नाटयसंकुलासाठी मा. राज्य शासनाकडून ३ कोटी रूपये अनुदान मिळेल यासाठी जमा व खर्च बाजूस ३ कोटी रकमेची तरतुद अंदाजपत्रकात करावी.

८) सभागृहातून प्राप्त सुचनांचा विचार करता शहरातील वाढत्या नागरी सुविधांची मागणी पूर्ण करताना मनपास येणा-या अडचणी पाहता नविन रोड रोलर खरेदी करणेत यावा. यास्तव अंदाजपत्रकामध्ये २० लक्ष रूपये रकमेची तरतूद करणेत यावी.

९) अहमदनगर महानगरपालिकेकडून नागरी सुविधा देताना विकास कामे हाती घेतली जातात परंतु ब-याच वेळेस अशी कामे कार्यारंभ आदेश देवूनही त्वरीत सुरू केली जात नाहीत परिणामी त्याबाबत नागरिकांमध्ये मनपा विषयी असंतोष निर्माण होतो या करिता मनपाचे काम घेणारे ठेकेदार संबंधीत संस्था यांना कार्यारंभ आदेश दिले पासून दहा दिवसा पर्यत सदरचे काम सुरू न केल्यास त्यास दंडात्मक कार्यवाही करावी. यानंतरही संबंधीत एजन्सीने काम सुरू न केल्यास काळया यादीत टाकणे बाबत कार्यवाही करावी. सदर कार्यवाही करणेसाठी मा.आयुक्त,अ.नगर मनपा यांना ही सभा अधिकार देत आहेत. नियमानुसार पुढील कार्यवाही करणेत यावी.

१०) अहमदनगर महानगरपालिकेच्या वतीने सुरू करण्यांत आलेले स्पर्धा परिक्षा मार्गदर्शन केंद्र ही महानगरपालिकेची ज्ञानार्जन करणा-या विद्यार्थ्यांचे उद्याचे उज्वल भविष्य घडविणारे केंद्र असल्याने त्यांना सोयी सुविधा उपलब्ध होण्याचे दृष्टिने ५ लक्ष रूपयेची आणखी तरतुद करावी.

११) रस्ते डांबरीकरण व नुतनीकरण या लेखाशिर्षावरील रु.८०.०० लाख व रस्ते मजबुतीकरण यावरील तरतुद रक्कम रु.५०.०० लक्ष वाढविण्यात यावी.

१२) "मुकुंदनगर येथे पाण्याची टाकी बांधणे " असे स्वतंत्र लेखाशिर्ष तयार करण्यात यावे. वत्यामध्ये ५० लक्ष रूपये तरतुद करण्यात यावी.

१३) शहरामध्ये निरनिराळया ठिकाणी असलेल्या स्मशानभूमी पैकी ब-याच स्मशानभूमी यांना अंतर्गत सुविधा नसल्याने मृत नागरिकांचे नातेवाईक / मित्र यांना दफन विधी प्रसंगी अडचणी येतात. सार्वजनिक ट्रस्टच्या अधिपत्याखाली असलेल्या स्मशानभूमींचा (दहन व दफनभूमी) पुरेशा निधीअभावी विकास करता येत नाही. त्यामुळे महानगरपालिकेची याबाबत सहकार्याची भूमिका असावी याबाबत सभागृहाने मांडलेल्या भावना विचारात घेता मानवतेच्या दृष्टिकोनातून व सदभावनापूर्वक विचार करून ही सभा सार्वजनिक ट्रस्टच्या अधिपत्त्याखालील स्मशानभूमी (दफनभूमी) यांना सुविधा देणे कामी मान्यता देत आहे. स्मशानभुमी सुधारणा व नविन स्मशानभुमी या लेखाशिर्षाखाली सन २००८-२००९ मध्ये रु.१८.०० लक्ष तरतुद वाढविणेस ही सभा मान्यता देत आहे. मात्र अशा प्रकारच्या सुविधा देताना त्यामध्ये पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, संरक्षक भिंत्त, तसेच दिवाबत्ती व्यवस्था याकामांचाच अंतर्भाव असावा अशा सुचविलेल्या कामाबाबत संबंधीत ट्रस्टचे कामाच्या आवश्यकते बाबतचे व नाहरकती बाबतचे लेखीपत्र महानगरपालिकेस प्राप्त झाल्यानंतरच पुढील कार्यवाही करण्यात यावी. स्मशानभूमी (दफनभूमी) यांना ट्रस्टच्या लेखी पत्रानुसार कामे करताना त्यांचे पत्रात करावयाच्या कामाची मागणी वा त्यासाठी हरकत नसले बाबत पत्र , ट्रस्टचा गेली तीन वर्षातील ताळेबंद तसेच घटना, उद्देश व ट्रस्ट धर्मदाय आयुक्त यांचेकडील नोंदणी प्रमाणपत्र असे संपूर्ण प्रकरण प्राप्त झाल्यानंतरच कार्यवाही करावी.

१४) मा.श्री.बहिरनाथ तुकाराम वाकळे नगरसेवक यांचे सभेमध्ये प्राप्त झालेल्या पत्रानुसार नागरीकांची अडचण दूर व्हावी, सावेडी गावठाणचा सिटी सर्व्हे करणेच्या कार्यवाहीसाठी ही सभा मान्यता देत असून याबाबत उचित कार्यवाही करणेत यावी याबाबत योग्य ते कार्यालयीन सोपास्कार पार पाडणेत यावेत. याकामासाठी अंदाजपत्रकात १ लाख रकमेची तरतूद करणेत यावी खर्च मंजूर.

१५) मा.श्री. शेख मुदस्सर अहमद इसहाक ,नगरसेवक यांचे पत्र आयुक्त साहेब व महापौर साहेब यांना सभेमध्ये प्राप्त झाले. याबाबत मटन व्यवसाय परवाने देणे तसेच खाजगी कत्तलखाने मटन विक्री परवाना देवून फी वसुल करणे कातडीसाठी जनावरांची कत्तल करणे, जनावरांचे मांस विकणा-या व्यक्तीना परवाना देणे आदी बाबत उहापोह या पत्रात करणेत आलेला असून महानगरपालिका उत्पन्न वाढीसाठी काही मार्ग यामध्ये सुचित केले आहेत. याची नोंद घेण्यात येत असून याबाबत सविस्तर कार्यालयीन प्रस्ताव तयार करून सक्षम प्राधिकरणाची मान्यता घेवून पुढील कार्यवाही करणेची सुचना ही सभा देत आहे.

१६) मा.श्री. सुनिल रा. कोतकर, नगरसेवक यांचे पत्राची हे सभागृह नोंद घेत असून केडगांव येथे जीम ची इमारत बांधणे कार्यवाही सुरू असून मार्गदर्शक कोच नेमणे आवश्यक आहे याबाबत आस्थापना सुचीवर स्त्री व पुरूष कोच नेमणेकरिता सदरचे नविन पद निर्माण करणेची प्रक्रीया हाती घेणे आवश्यक आहे. मा.शासनाकडे सदरचा प्रस्ताव पाठविणे त्यास मंजूरी मिळविणे यास काही कालावधी लागण्याची शक्यता आहे. याकरिता तात्पुरत्या स्वरूपात नेमणुक करून सदर ठिकाणी महिला कोच तसेच पुरूष जिमसाठी पुरूष कोच मार्गदर्शन करणेकामी उपलब्ध करून देणेत यावा. व महानगरपालिकेचे स्वतःचे कुस्ती संकूल उभारावे त्यासाठी येणा-या खर्चासाठी अंदाजपत्रकात आवश्यक तरतुद करणेत यावी. खर्च मंजूर.

१७) यु.आय.डी.एस.एस.एम.टी. योजनेतील सर्वच प्रकल्प नागरी सुविधेच्या व व्यापक विकास प्रक्रीयेच्या दृष्टिने आवश्यक व उपयुक्त आहेत याकरिता या योजनेचा ठोस व कालबध्द कार्यक्रम तयार करणेत यावा.

१८) नाटयगृह उभारणीतून शहरातील कला,साहित्य, सांस्कृतिक क्षेत्रांना व्यापक असे व्यासपीठ उपलब्ध होणार आहे याकरिता या आर्थिक वर्षात सदर प्रकल्पास प्राधान्य देण्यात यावे.

१९) एकात्मिक गृह निर्माण झोपडपट्टी विकास कार्यक्रमाच्या माध्यमातून लवकरात लवकर या बाबत सर्व्हे करून पुढील कार्यवाही कालबध्द कार्यक्रम आखून करणेत यावी.

२०)छत्रपती संभाजी महाराज यांचा पुतळा बसविणे याबाबतचा कार्यालयीन प्रस्ताव तयार असून त्याचे कामास प्रशासनाने गती देणेत यावी.

२१)बी.ओ.टी. तत्वावर खत प्रकल्प सुरू करणेचे कामास तातडीने कार्यवाही करणेत यावी .

२२)महापौर चषक कुस्ती स्पर्धेप्रमाणेच राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धा,क्रिकेट सामने व टेबल टेनिस स्पर्धा आयोजित करण्यात याव्यात. क्रीडा क्षेत्रास विशेष प्रोत्साहन म्हणून राज्यशासनाच्या क्रीडा व युवक संचालनालयाच्या मिशन ऑलम्पिक चॅम्पियनसाठी गुणवंत खेळाडूंना महानगरपालिकेच्या वतीने विशेष सहकार्य करण्यात येवून किमान दोन खेळातील खेळाडू मिशन ऑलम्पिकमध्ये जातील यासाठी प्रयत्न केले जातील याकामी सन २००८-०९ च्या अंदाजपत्रकामध्ये तरतूद करण्यास ही सभा मान्यता देत आहे.

२३)उदयानामध्ये झाडी, झुडपे, खेळण्या बसविणे  व लहान मुले यांना खेळण्यासाठी मोकळा परिसर, प्रौढांना फिरण्यासाठी व बसण्यासाठी जागेचे मोकळेपण नाहीसे होत चालले असल्याची बाब निदर्शनास आल्याने महानगरपालिकेच्या विकसीत उदयानामध्ये शक्यतो कुठलेही बांधकाम करण्यात येवू नये असे धोरण ही सभा ठरवत असून या निर्णयाची अंमलबजावणी प्रशासनाने करावी. मात्र नागरिकांच्या दृष्टिने सदर ठिकाणी बांधकाम करणे झाल्यास संबंधीत बाबत नकाशासह परिसर नागरिकांचा अर्ज व त्यावर सक्षम प्राधीकरणाचा प्रस्ताव मा.आयुक्त यांचेकडे दाखल करणे आवश्यक राहील व अशा प्रकरणामध्ये मा.आयुक्त यांनी बांधकाम परवानगी दिल्यानंतरच सदर ठिकाणी बांधकाम करणे बाबत कार्यवाही करता येईल असे तत्व देखील ही सभा ठरवित आहे.

२४) रस्ते विकास प्रकल्प राबविण्यात यावा सदर प्रकल्पासाठी सन २००८-०९ या अंदाजपत्रकात ५ लक्ष रू. तरतुद केली असून, विकास भार निधी मधून रक्कम रूपये ३ कोटी सदर लेखाशिर्षामध्ये वर्ग करण्यात यावे.

२५) मा.केंद्र शासनाच्या UDISSMT  योजने अंतर्गत मंजूर झालेली केडगांव पाणी पुरवठा योजना ही महाराष्ट्र जीवन प्राधीकरण मंडळ यांचेमार्फत तांत्रिक परिवेक्षणाखाली (टेक्निकल सुपरव्हीजन) अन्वये योजना पूर्ण करण्यात यावी सदरकामी अंदाजपत्रकीय रकमेच्या ५% फी देण्यास ही सभा मंजूरी देत आहे. खर्च मंजूर.

२६) अहमदनगर पाणी पुरवठा योजने अंतर्गत मुळा नगर व विळद येथील अतिरिक्त ५६० एच.पी.चे पंप नग दोन व मोटार तसेच ३०० एच.पी.चे पंप नग दोन व मोटार खरेदी करून बसविणेकामी देखील ही सभा मंजूरी देत आहे. खर्च मंजूर.सदरचे काम महाराष्ट्र जीवन प्राधीकरण मंडळ यांचेकडून अंदाजपत्रके व आराखडे तयार करून घेण्याबाबत योग्य ती कार्यवाही करण्यात यावी तसेच त्यांचेकडील तांत्रिक पर्यवेक्षणाखाली (टेक्निकल सुपरव्हिजन) सदरच्या कामाबाबत कार्यवाही करण्यात यावी व त्यांचेकडील पत्राप्रमाणे सदर कामाबाबतची त्यांची फी अदा करण्यासाठी येणा-या खर्चास देखील मंजूरी देण्यात येत आहे. पेयजल ही नागरी सुविधेच्या दृष्टिने व जीवनावश्यक बाब असल्याने सदरच्या कामास प्राधान्य देण्यात यावे.

२७) श्री.पंकज शिरसाठ , आंतरराष्ट्रीय कबड्डीपटु यांना जागतिक पातळीवर सरावासाठी व खेळण्यासाठी जाणेकामी अर्थसहाय्य करणेबाबत महानगरपालिकेने निर्णय घेतला होता. सदरचा ठराव मा.शासनाकडे मंजुरीसाठी पाठविलेला आहे. परंतु बराच कालावधी लोटुनही श्री.पंकज शिरसाठ यांना अद्यापपर्यंत अर्थसहाय्य उपलब्ध होत नसल्याने क्रिडा क्षेत्रामधुन व वृत्तपत्राच्या माध्यमातुन याबाबत वेळोवेळी बातम्या प्रसिध्द झालेल्या आहेत. सभागृहामध्ये सदस्यांनी व्यक्त केलेल्या भावनेचा विचार करता तसेच  सभागृहाचा कल पाहता व संबंधीत उपविधी तयार करुन पाठविणेबाबत लवकरच कार्यवाही करण्यात येणार असल्याबाबत प्रशासनाने दिलेल्या माहितीचा विचार करता व  यापुर्वी झालेल्या निर्णयानुसार श्री.पंकज शिरसाठ यांना १,५०,०००/-

(अक्षरी रु.एक लक्ष पन्नास हजार मात्र) अदा करण्यास ही सभा मान्यता देत आहे. सदर कामी मा.शासनाची कार्योत्तर मंजुरी घेण्यात यावी. खर्च मंजुर.

२८) सन २००८- ०९ मध्ये नगरसेवक स्वेच्छा निधीतून प्रत्येकी रू. १.०० लाख कमी करून रस्ते डांबरीकरण या लेखा शिर्षाखाली वर्ग करावेत रस्ते डांबरीकरणावरील एकूण तरतूद रू. २.३० कोटी करण्यात यावी.

२९) नविन इमारत या लेखा शिर्षाखाली आणखी २२ लक्ष रूपये रक्कमेची तरतुद वाढविणेत यावी.

सदर अंदाजपत्रकाच्या २०० प्रती छापुन घेण्यास व त्याकामी येणा-या खर्चास ही सभा मंजुरी देत आहे. खर्च मंजुर. नियमानुसार कार्यवाही करावी.

सोबत सन २००७-२००८ चे सुधारित व सन २००८-२००९ चे मुळ अंदाजपत्रकातील बदल केलेल्या तरतुदींचा तक्ता.

ठराव बहुमताने मंजूर

सुचक - मा.श्री.कृष्णा जाधव<br>
अनुमोदक - मा.श्री.अशोक कानडे

सही /-<br>
महापौर,<br>
अहमदनगर महानगरपालिका.

२९)  पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी अपारंपारीक उर्जेस प्रोत्साहन देणे आवश्यक आहे. त्यासाठी बायोगॅस निर्मिती , सौरउर्जा तसेच रेनवॉटर हार्वेस्टिंग या तीन योजना पैकी एक योजना ज्या इमारतीत वापरली जाते त्या इमारतीच्या मालकांना महानगरपालिका प्रॉपर्टी टॅक्स मध्ये १० टक्के सूट किमान पाच वर्षाकरीता देण्यांत यावी. ही सुट जास्तीत जास्त रू.१००० /- असावी. तसेच कार्बन क्रेडीट ट्रेडिंग अधिकारा बाबतचे फॉर्म महानगरपालिकेकडे भरून घेण्यांत यावे.

अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर
मा.स्थायी समिती सभा क्रमांक-१५
सन २००७-२००८.

विषय क्रमांक :- १ बुधवार दिनांक ३०/१/२००८

---

ठराव क्रमांक :- १ बुधवार दिनांक ३०/१/२००८

**प्रस्तावाचा विषय -** मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९५ अन्वये तयार केलेले महानगरपालिके चे सन २००७-२००८ सालचे सुधारीत व सन २००८-२००९ सालचे मा.आयुक्त साहेब सादर करणार असलेले मुळ अंदाजपत्रक [ म.न.पा. स्कुल बोर्डा सह] विचारार्थ.

अंदाजपत्रकीय सभा बुधवार दिनांक ३०/१/२००८ रोजी बोलावलेली व पुढे सोमवार दिनांक ४/२/२००८ , मंगळवार दिनांक ५/२/२००८ रोजी चालू असलेल्या सभे मध्यें मा.स्थायी समिती सदस्य यांनी खालील प्रमाणे सुचना केल्या व त्यांची मते मांडली.

मा.सभापती साहेब :- मा.आयुक्त साहेब यांनी सन २००८-२००९ सालाचे मुळ अंदाजपत्रक सादर करतांना मनोगतामध्ये सुचविलेल्या योजना या म.न.पा. चे भविष्यातील वाटचाली मधील महत्वाचा टप्पा ठरणा-या योजना असल्याने त्या राबविणे कामी उपाय योजना करणेस तसेच अंदाज पत्रका सोबत सन २००८-२००९ या आगामी वर्षा पासून गणेशोत्सव मांडव भाडे दर कमी करणे, सिध्दीबाग जलतरण तलावाचे फी मध्ये वाढ करणे, आरोग्य विभागाचे परवाना शुल्का मध्ये वाढ करणे. कटक मंडळ भिंगार यांचे बरोबराचे संयुक्त जकात वसुलचे कराराची मुदत वाढविणे बाबत संबंधीत विभागाने सादर केलेले प्रस्ताव मंजूर करणेस शिफारस करण्यांत येत आहे.

मा. श्री. कोतकर भा.ए. :- अहमदनगर महानगरपालिका हद्दी मधील हॉटेल, खाणावळी, लॉज, बीअर बार, पानटप-या इत्यादी व्यावसायी जागांचे,दुकानांचे सर्व्हेक्षण करणेत यावे. सदरचे सर्व्हेक्षणानुसार जाहिरात बोर्ड कर, म्यु.पल लायसन्स फी, आरोग्य परवाना फी इत्यादी चे कर आकारणीत सुधारणा करता येतील, आकारणी मध्ये वाढ होईल. आगामी वर्षासाठी जाहिरात बोर्ड जागा भाडे चे उत्पन्नात रूपये दहा लाख वाढ धरावी .

मा.सभापती साहेब :- मार्केट व स्लॉटर फी [ रस्ता बाजू फी ] म्हणून दर्शविलेल्या लेखाशिर्षा वरील उत्पन्न फारच कमी आहे. नगरपालिका असतांना रस्ता बाजू फी जादा वसुल होत होती. सदरचे रस्ता बाजू फी वसुली साठी खाजगी अभिकर्ता नेमल्यास उत्पन्न दुप्पट होईल. सदर कामी वापरल्या जाणा-या म.न.पा. स्टाफ कडून इतर कामे करून घेता येतील.आगामी वर्षाचे उत्पन्नामध्ये मार्केट व स्लाटर फी (रस्ता बाजू फी) या लेखाशिर्षा वर रूपये दहा लाखाची वाढ करणेत यावी.

मा.श्री. शेख आरिफ शे.र. :- म.न.पा. हद्दीतील वाढत्या वस्त्यां मध्ये विदयुती करण करणेत यावे.

मा. श्री. शिंदे द.बा :- १५० वॅट सोडीयम व्हेपर पोल टाकणे उर्जा बचत दिवे बसविणे या लेखाशिर्षा वर असलेली तरतूद आगामी वर्षासाठी कमी करावी.

मा.श्री. कोतकर भा.ए. :- शहर सुशोभिकरणाचे कामासाठी नवीन इलेक्ट्रीक पोल स्ट्रीट लाईट स्पॅन फिटींग या लेखाशिर्षावर असलेली तरतूद आगामी वर्षासाठी कमी कमी करावी. तसेच इलेक्ट्रीक विभागाकडेस नेमलेल्या वायरमन चे मानधानाची तरतूद केलेली नसल्याने वायरमन मानधनासाठी रक्कम रूपये दोन लाखाची तरतूद या व आगामी वर्षा साठी रूपये सात लाख तरतूद करावी.

मा.श्री. शिंदे द.बा. :- नवीन सहा मुख्य रस्त्यांची कामे,नेप्ती नाका ते अप्पु हत्ती, कोठी ते यश पॅलेस या रस्त्याची कामे प्रगती पथावर असल्याने तसेच इले. पोल हलविण्यांची कामे बाकी असल्याने त्या साठी जुने पोल हलविणे या लेखा शिर्षावरील तरतूद वाढवावी.

मा.श्री.कोतकर भा.ए. :- म.न.पा. मार्फत घनकचरा व्यावस्थापना अंतर्गत तसेच अग्निशमन विभागाकरिता नवीन वाहने खरेदी करणे असल्याने सन २००८-२००९ सालकरिता मोटार इन्शुरन्स या लेखा शिर्षा वर असलेली तरतूद दोन लाखांनी वाढवून रूपये दहा लाख अशी करावी.

मा. सभापती साहेब :- वाहन भाडे [ इंधना व्यतिरिक्त] असलेली तरतूद दहा लाखांनी वाढवून रूपये तीस लाख करावी.

मा.श्री.कोतकर भा.ए.:- कचरा डेपो साठी जागा वाढविणे आवश्यक असल्याने जागा खरेदी साठी असलेली तरतूद वाढवावी.

मा.श्री. शिंदे द.बा. :- म.न.पा. हद्दीतील कचरा कुंडया, शौचालय, मुता-या इत्यादी ठिकाणी रोजचे रोज ब्लीचिंग पावडर फवारली जात नाही त्यामुळे नागरिकांचे आरोग्यास धोका निर्माण होउ शकतो त्या करिता घाणीच्या ठिकाणी ब्लीचिंग पावडर जास्तीत जास्त वापरण्यांत यावी. सर्व सॅनिटरी इन्स्पेक्टर यांनी तशी कार्यवाही करावी.

मा.श्री. कोतकर भा.ए. :- रस्ते कॉक्रीटीकरणासाठी असलेली तरतूद जास्त आहे. ती रूपये पस्तीस लाखांनी कमी करावी. तसेच म.न.पा. हद्दीत असलेल्या गावठांण भागातील मोकळया जागी तसेच रस्त्यांच्या कडेला वाढलेल्या वेडया बाभळी झाडे झुडपे तोडण्यासाठी एक जे.सी.बी भाडे कराराने घेण्यांत यावा. तसेच रस्त्याचे कामांसाठी ही एक रोलर, ट्रॅक्टर, ढंपर इत्यादी घेण्यांत येउन ते बांधकाम विभागाचे अखत्यारीत ठेवणेत यावेत त्या करिता रूपये वीस लाखाची तरतूद करणेत यावी.दुसरा जे.सी.बी. वर्क शॉप येथे ठेउन मागणी प्रमाणे त्या पासून कामे करता येतील.

मा.सौ. दिघे वि.रा. :-मुकुंदनगर भागातील नाल्यावर पुलांची कामे करावीत आवश्यक त्या पुलांचे कामांसाठी असलेली तरतूद वाढवावी .

मा.श्री. कोतकर भा.ए. :- बुरूडगांव वारूळाचा मारूती येथील पुलांचे कामांसाठी पुल बांधणे या लेखा शिर्षा वरील तरतूद वाढवावी.

मा.सौ. पवार स.बा. :- सावेडी उपनगरासाठी एका मंगल कार्यालयाचे तसेच क्रिडांगणाची ही आवश्यक तरतूद करावी. मंगल कार्यालयाचे बांधकाम करण्यांत यावे.

मा.श्री. शिंदे द.बा. :- प्रतेंक विभागाकडेस बजेट रजिस्टर ठेवणे आवश्यक असुन त्या मधील नोंदी अद्यावत असाव्यात बांधकाम विभागाकडील शिल्लक निधीची माहिती मिळत नाही त्यांचे रजिस्टर मुख्य लेखाधिकारी यांचे कार्यालयात ठेवावे.

मा.श्री. शेख आरिफ शे.र. :- महापौर चषकस्पर्धे साठीची तरतूद कमी वाटत असल्याने ती वाढवून रक्कम रूपये तीस लाख करावी.

मा.श्री. कोतकर भा.ए. :- शिक्षण मंडळाचे अधिकारी सभेमध्ये उपस्थित नाहीत. बजेट सारखा महत्वाचा विषय असुनही ते किंवा त्यांचे विभागाचे वतीने कुनीही सभेत उपस्थित नाहीत त्यांचे वर प्रशासनाने कारवाई करावी. म.न.पा.चे शाळा मधील विद्यार्थी संख्या वाढविणे साठी म.न.पा.ने विद्यार्थाना वहया,पुस्तके, दप्तर असे शैक्षणिक साहित्य व छत्री, रेणकोट, जार्किन्स इत्यादी आवश्यक साहित्य पुरवावे. त्यासाठी गणवेश खरेदी या लेखा शिर्षाचे नांव बदलून शैक्षणिक साहित्य खरेदी असे लेखा शिर्ष करावे त्या वरील तरतूद वाढवावी. विद्यार्थाना प्रोत्साहन दिले तर म.न.पा. शाळेतील विद्यार्थी संख्या वाढेल.

मा.सौ. पवार सं.बा. :- म.न.पा. शाळे मध्ये विद्यार्थी कमी येतात त्यांची संख्या वाढणे आवश्यक आहे त्यासाठी शाळेच्या इमारतीही चांगल्या आकर्षक असणे आवश्यक आहे. कार्यालय, शाळा दुरूस्ती या लेखा शिर्षा खाली असलेला तरतूद वाढवावी. म.न.पा. च्या सर्व शाळांची दुरूस्ती करून सुशोभिकरण करावे, पाणी पुरवठयांची तसेच शौचालय मुता-याची ही सोय उत्तम प्रकारे करावी. म.न.पाचे सर्व शाळाचे नुतनीकरणाचे काम एकाच वेळी करावे.

मा.श्री. कोतकर भा.ए.:- विद्यार्थाना ते पास झाल्यास त्यांना शिष्यवृत्ती द्यावी शिक्षकांचा शिक्षक दिनी सत्कार करावा. त्यांना प्रोत्साहन द्यावे.

मा.सौ. पवार स.बा. :- म.न.पा.चे शाळा मधील शिक्षणाचा दर्जा ही सुधारला पाहिजे.

मा.श्री.कोतकर भा.ए.:- कॅन्टोन्मेट बोर्डाला जकाती पोटी देण्यांत येणारा एक कोटी हिस्सा माफ करून घेणे यांचे हद्दीत नाके उभारणे साठी कॅन्टोन्मेट बोर्डाची मंजूरी मिळणे करिता त्याचे मुख्यांशी पत्रव्यवहार करणेत यावा.

मा.सभापती साहेब :- नाका विभागा करिता जकात नाक्या साठी घेतलेल्या जागांचे भाडे, बांधकाम दुरूस्ती व स्थलांतर या लेखा शिर्षा वरील तरतूद रूपये तीस लाखांनी वाढूवन रूपये पस्तीस लाख करावी.

मा.श्री. कोतकर भा.ए.:- रस्ते मजबुती करण या लेखा शिर्षा खाली असलेली तरतूद कमी आहे. ब-याच भागातील रस्ते मजबुत होणे आवश्यक आहे त्या साठी असलेली तरतूद वाढवावी.

मा. सौ.पवार स.बा. :- मंगल कार्यालयासाठी असलेली तरतूद कमी आहे. सावेडी भागासाठी मंगल कार्यालय होणे आवश्यक आहे त्यासाठी ची तरतूद वाढवावी. सार्वजनिक शौचालय साठीची तरतूद ही कमी आहे ओपन स्पेस मध्ये गार्डन विकसीत करावेत.

मा.श्री. कोतकर भा.ए. :- म.न.पा. हद्दीतील शौचालये मेन्टेनन्स साठी देण्यांत यावे. केडगांव भागामध्ये सार्वजनिक शौचालय बी.ओ. टी. तत्वावर बांधणे साठी आवश्यक ती कार्यवाही करावी.

मा.श्री. शेख आरिफ शे.र.व मा.श्री. कोतकर भा.ए. :- म.न.पा. हद्दीतील मुस्लीम,ख्रिश्चन तसेच इतर धार्मिया साठी असलेल्या स्मशानभूम्या या खाजगी ट्रस्ट च्या मालकीच्या आहेत. त्यावर म.न.पास खर्च करता येत नाही. मात्र अशा स्मशान भुमी मध्ये दिवाबत्ती व इतर आवश्यक सोई सुविधा करणे मनपाचे कर्तव्य आहे त्यासाठी सदर ट्रस्ट चा ना हरकत दाखला घेउन स्मशानभुमी मधील आवश्यक कामे करण्यांत यावीत. स्मशानभुमी सुधारणा व नवीन स्मशानभुमी साठी असलेली तरतूद रूपये तीस लाखांनी वाढवून रू.चाळीस लाख करावी. तसेच नागापुर भागात म.न.पा. खरेदी करीत असलेल्या स्मशान भुमी करीतांचे सात एकर जागे पैकी ख्रिश्चन समाजाचे स्मशान भुमी साठी दोन एकर जागा देणेस मंजूरी द्यावी.

मा.सौ. दिघे वि.रा.:-नवीन प्रशासकीय इमारतीसाठी ठेवलेली तरतूद कमी करावी.

मा.श्री. शिंदे द.बा.:- घरकुल योजनेसाठी ची तरतूद वाढवावी.

मा. श्री.कोतकर भा.ए.:- नगरसेवकांसाठीचा स्वेच्छा निधी प्रतेंकी दहा लाख करणेत यावा.

मा.श्री. शेख आरिफ शे.र.:- कत्तलरवाने विकसीत करणे साठी असलेली तरतूद वाढवावी. सर्व मटन मार्केट चांगले सुशोभित करावेत.

मा.सभापती साहेब :- भु. संपादना साठी असलेला तरतूद कमी असुन म.न.पा मार्फत खरेदी करावयाच्या जागा साठी चे भुसंपादनासाठी तरतूद वाढवावी.

मा.श्री. कोतकर भा. ए. :- महापौर शहर विकास निधी म्हणून सन २००७-२००८ सालासाठी रूपये २ कोटी व सन २००८-२००९ सालासाठी २ कोटी करण्यांत यावा. तसेच मा. स्थायी समिती, सभापती शहर विकास निधी व मा.उपमहापौर शहर विकास निधी यांचे नावाने महापौर निधी सारखा प्रतेंक पंचवीस लाखाची निधी ठेवण्यास मंजूरी देण्यांत यावी.

मा.सौ. दिघे वि.रा. :- मुकुंदनगर, केडगांव भागासाठी पाण्याच्या उंच टाक्यांचे बांधकाम करावे त्यासाठी ची तरतूद करावी.

मा.श्री. कोतकर भा.ए. :- नवीन पाईप लाईन साठीची तरतूद शहरी भागासाठी कमी करून हद्दवाढी च्या भागासाठी वाढवावी. तसेच केडगांव, मुकुंदनगर भागातील पाणी पुरवठा सुरळीत करणे कामी मुकुंदनगर केडगांव भागामध्ये पाण्याचे टाक्या बांधणे साठी तरतूद करणेत यावी. तसचे ठिकठिकाणचे ओपन स्पेस मध्ये गार्डन विकसीत करणेत यावे. गार्डन डेव्हलप करणे साठी तरतूद वाढविणेत यावी.

मा.सभापती साहेब :- महापौर दूर्धर रोग निवारण निधी सन २००७-२००८ सालासाठी रूपये वीस हजाराने वाढवून रक्कम रूपये दोन लाख वीस हजार करणेत यावा.

मा.सौ. दिघे वि. रा. :- मुकुंदनगर भागात म.न.पा. मार्फत आरोग्य केंद्राची सुविधा तातडीने पुरविणे कामी आवश्यक ती कार्यवाही करणेत यावी.

मा.सभापती साहेब :- मागील वर्षाचे बजेट मंजूरीचे वेळी बेग पटांगण येथे विकास भार निधीतुन प्रशासकीय इमारत बांधणेचे ठरले होते. विकास भर निधी तसाच शिल्लक आहे. या निधीतुन कामे व्हावीत. घरकुल योजना म.न.पा. मार्फत राबविण्यांत येणार असल्यामुळे घरकुल योजना या लेखा शिर्षा वरील तरतूद वाढवावी.

मा.सभापती साहेब :- त्याच प्रमाणे मा. सदस्यांनी चर्चे मध्ये सुचविल्या नुसार कामे अंदाजपत्रकातील संबंधीत लेखा शिर्षा मधून करणेत यावीत. नवीन लेखा शिर्ष तयार करून तरतूदी कमी जास्त करणेस मंजूरी देणे विषयी शिफारस करण्यांत यावी.

**ठराव :-** मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९५ अन्वये मा.आयुक्त साहेब यांनी तयार केलेले व स्थायी समिती कडे सादर झालेले अहमदनगर महानगरपालिकेचे सन २००७-२००८ सालचे सुधारीत व सन २००८-२००९ सालचे बाबवार अंदाजपत्रक म.न.पा. स्कुल बोर्डासह चे तसेच सन २००८-२००९ सालचे अंदाजपत्रका सोबतचे.

**प्रस्ताव क्रमांक एक :-** गणेशोत्सव सन २००७ या उत्सवामध्ये भाग घेतलेल्या गणेश मंडळाचे मांडव भाडे तफावतीची रक्कम परतावा करणे व पुढील काळात सन २००८-२००९ चे अर्थ संकल्पात दर सुधारीत करणे बाबत.

**प्रस्ताव क्रमांक दोन :-** अहमदनगर महानगरपालिकेच्या मालकीच्या सिध्दीबाग येथील जलतरण तलवाचे पोहण्याचे दराबाबत.

**प्रस्ताव क्रमांक तीन :-** मुंबई प्रांतिक म.न.पा अधिनियम १९४९ चे कलम ४९३ परिछेद ४ पॅरा ५चे संक्रमन कालीन तरतूदीनुसार म्यु.पल अॅक्ट खालील परवाना शुल्क मध्ये वाढ करणे बाबत.

**प्रस्ताव क्रमांक चार :-** अहमदनगर महानगरपालिका व कटक मंडळ भिंगार ( कॅन्टोन्मेट बोर्ड भिंगार ) यांच्यातील संयुक्त जकात कर वसुली बाबत कराराची मुदत दिनांक १/४/२००८ ते दिनांक ३१/३/२००९ या कालावधी करिता वाढविणे बाबत.असे करा दरा बाबतचे कार्यालयीन प्रस्ताव सभे समोर पाहिले.

सन २००८-२००९ सालचे बाबवार जमा खर्चाचे मुळ अंदाज पत्रकावर व सन २००८-२००९ या आगामी वर्षापासून कराचे दरामध्ये फी मध्ये वाढ, घट करणे, कटक मंडळ भिंगारचे जकात कराराची मुदत वाढविणे बाबत संबंधीत विभागाने सादर केलेल्या सविस्तर प्रस्तावावर सभे मध्ये साधक बाधक चर्चा करणेत येउन ही सभा पुढील प्रमाणे शिफारस दुरूस्त्या करीत आहे.

**प्रस्ताव क्रमांक एक :-** सन २००७-२००८ सालासाठी आकारणी करण्यांत आलेला रूपये ३०/- प्रतिदिन प्रती १०० चौ. फुटासाठीचा मांडव भाडेचा दर कमी करून मांडव भाडे रक्कम गणेश मंडळास परतावा करणेस व सन २००८-२००९ या आगामी वर्षा करिता रूपये १०/- प्रती दिन प्रती १०० चौ. फूटासाठी मांडव भाडेचा दर सुधारीत करणेस मंजूरी देणेस शिफारस करण्यांत येत आहे.

**प्रस्ताव क्रमांक दोन :-** अहमदनगर महानगरपालिकेच्या मालकीच्या सिध्दीबाग येथील जलतरण तलावाचे पोहण्याचे सध्याचे दर

| | |
|---|---|
| १] पुरूष व विद्यार्थी रू. १०/- | ऐवजी रूपये १५/- |
| २] पुरूष ( मासिक दर ) रू. १५०/- | ऐवजी रूपये २००/- |
| ३] स्त्रिया व विद्यार्थीनी रू. १०/- | ऐवजी रूपये १५/- |
| ४] स्त्रिया ( मासिक दर) रू. १००/- | ऐवजी रूपये १५०/- |
| | नव्याने प्रशिक्षण फी -रूपये ३००/- |

याप्रमाणे सन २००८-२००९ सालाकरिता दर आकारणी करणेस मंजूरी देणेस शिफारस करण्यांत येत आहे.

**प्रस्ताव क्रमांक तीन :-** मुंबई प्रांतिक म.न.पा. अधिनियम १९४९ कलम ४९३ परिछेद ४ पॅरा ५चे संक्रमण कालीन तरतूदीनुसार म्यु.पल ॲक्ट खालील परवाना शुल्क मध्ये कार्यालयीन प्रस्तावानुसार वाढ करून आकारणी करणेस मंजूरी देणेस शिफारस करण्यांत येत आहे.

**प्रस्ताव क्रमांक चार :-** अहमदनगर महानगरपालिका व कटक मंडळ भिंगार ( कॅन्टोन्मेट बोर्ड भिंगार) यांच्या तील संयुक्त जकात कर वसुली बाबत कराराची मुदत दिनांक १/४/२००८ ते दिनांक ३१/३/२००९ या कालावधी करिता वाढविणेस व रूपये एक कोटी फक्त जकात हिरसा पोटी कॅन्टोन्मेट बोर्डास देणेस मंजूरी देणेस शिफारस करण्यांत येत आहे.

त्याच प्रमाणे मा. आयुक्त साहेब यांनी मनोगता मध्ये सुचविलेल्या योजना राबविणे कामी उपाय योजना करणेस शिफारस करण्यांत येत आहे. तसेच मा. सदस्यांनी सुचविलेली कामे अंदाजपत्रकातील संबंधीत लेखा शिर्षा मधून करणेत यावीत.

सन. २००७-२००८ चे सुधारीत व सन २००८-२००९ सालचे अंदाजपत्रकामध्ये सभेमध्ये झालेल्या सविस्तर चर्चे प्रमाणे सोबत जोडलेल्या तक्त्या मध्ये दर्शविल्या नुसार जमा व खर्चाच्या अंदाजीत रकमा कमी /जास्त करणेस, नवीन लेखा शिर्ष तयार करून त्यावर तरतूद करणेस मंजूरी देणे विषयी शिफारस करण्यांत येत आहे.

अंदाज पत्रकाच्या दोनशे प्रती छापून घेउन म.न.पा. सदस्यांना देण्यांत याव्यात, खर्च मंजूर.

वरील प्रमाणे सुचविलेल्या दुरूस्त शिफारसी सह सन २००७-२००८ सालचे सुधारीत व सन २००८-२००९ सालचे बाबवार मूळ अंदाजपत्रक महानगरपालिका शिक्षण मंडळच्या हिस्सा सह मा. महानगरपालिका सभे पुढे सादर.

नियमानुसार कार्यवाही करावी.
सुचक :- मा.श्री. शेख आरिफ शे.र.
अनुमोदक :- मा.सौ. पवार सं.बा.
ठराव सर्वानुमते मंजूर.

सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**सोबत** :- सन.२००७-२००८ सालचे सुधारीत व सन-२००८-२००९ सालचे मुळ अंदाजपत्रकात केलेल्या बदलांचा तक्ता.

| अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर |
|---|
| मा. स्थायी सभेने मंजुर केलेले सन २००७-२००८ चे सुधारीत अंदाजपत्रक |
| |
| सुरवातीची शिल्लक ( दि. १/०४/२००७) .......................................... ५००००० |
| एकुण जमा ........................................................................ १०९४७६१५०० |
| सुरवातीचे शिलकेसह एकुण जमा ............................................... १०९५२६१५०० |
| एकुण खर्च ........................................................................ १०९४७६०९०० |
| अखेरची अंदाजे शिल्लक ( दि. ३१/३/२००८) ....................................... ५००६०० |

| अ.नं. | लेखाशिर्ष( जमा बाजू) | मा.आयुक्त यांनी सुचविलेली तरतूद | मा.स्थायी सभेने केलेले बदल | | मा.स्थायी समितीने मंजूर केलेली तरतूद |
|---|---|---|---|---|---|
| | | | वाढ | घट | |
| १ | २ | ३ | ४ | ५- | ६ |
| १. | नळधारकाकडून जमा पाणीपट्टी | ७७४००००० | २६००००० | | ८०००००० |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | **७७४००००** | **२६००००** | **०** | **८०००००००** |

| अ.नं | लेखाशिर्ष ( खर्च बाजू ) | मा.आयुक्त यांनी सुचविलेली तरतूद | मा.स्थायी सभेने केलेले बदल | | मा.स्थायी समितीने मंजूर केलेली तरतूद |
|---|---|---|---|---|---|
| | | | वाढ | घट | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १. | महापौर चषक स्पर्धा | २५०००००० | ५०००००० | | ३००००००० |
| २. | महापौर शहर विकास निधी | १०००००००० | १०००००००० | | २००००००००० |
| ३. | महापौर दुर्धररोग निवारण निधी | २०००००० | २००००० | | २२००००० |
| ४. | नाका भाडे, बांधकाम, दुरूस्ती व स्थलांतर | ५०००००० | ३००००००० | | ३५०००००० |
| ५. | वायरमन ( मानधन ) | ० | २०००००० | | २०००००० |
| ६. | रस्ते दुरूस्ती ( पॅचिंग व मुरूम टाकणे) | ३२०००००० | | ३००००००० | २९००००००० |
| ७. | रस्ते कॉक्रीटीकरण | १०८०००००० | | २५०००००० | ८३०००००० |
| ८. | नवीन गटर | १४५२२००० | | २५०००००० | १२०२२००० |
| ९. | पुतळे बसविणे | १५०००००० | | १०००००० | ५०००००० |
| १०. | कत्तलखाना विकसीत करणे | ५०००००० | | ४०००००० | १०००००० |
| ११. | भू- संपादन | ५०००००० | | ४०००००० | १०००००० |
| १२. | पाणी पुरवठा सर्वेक्षण | ४०००००० | | ३०००००० | १०००००० |
| १३. | अपंग पुनर्वसन योजना | ५०००००० | | ४०००००० | १०००००० |
| १४. | वृक्ष गणना व नंबर टाकणे | २०००००० | | १५००००० | ५००००० |
| १५. | जाहिरात खर्च | १५०००००० | | ३०००००० | १२०००००० |
| १६. | वर्कशॉप स्थलांतर व विकसित करणे | ५०००००० | | २७००००० | २३००००० |
| १७. | पल्स पोलिओ, कुटुंब कल्याण कार्यक्रम, शालेय आरोग्य शिक्षण, राष्ट्रीय कार्यक्रम | १५००००० | १०००००० | | २५००००० |
| | | **७६२७२०००** | **१३८२००००** | **११२२००००** | **७८८७२०००** |

सही /-

**श्री. अविनाश हरिभाऊ घुले**

सभापती,

स्थायी समिती

अहमदनगर महानगरपालिका,

| अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर |
|---|
| मा. स्थायी सभेने मंजुर केलेले सन २००८-२००९ चे मुळ अंदाजपत्रक |
| |
| सुरवातीची शिल्लक ( दि. १/०४/२००८) ........................................ ५००००० |
| एकुण जमा ..................................................................... १६६०९०५००० |
| सुरवातीचे शिलकेसह एकुण जमा .............................................. १६६१४०५००० |
| एकुण खर्च ....................................................................... १६६०९०५००० |
| अखेरची अंदाजे शिल्लक ( दि. ३१/३/२००९) ...................................... ५००६०० |

| **अ.नं** | **लेखाशिर्ष( जमा बाजू)** | **मा.आयुक्त यांनी सुचविलेली तरतूद** | **मा.स्थायी सभेने केलेले बदल** | | **मा.स्थायी समितीने मंजूर केलेली तरतूद** |
|---|---|---|---|---|---|
| | | | **वाढ** | **घट** | |
| **१** | **२** | **३** | **४** | **५** | **६** |
| | | | | | |
| १. | सर्वसाधारण कर | १३००००००० | १५०००००० | | १४५०००००० |
| २. | मार्केट व स्लॉटर फी ( रस्ता बाजू फी ) | २०००००० | १०००००० | | ३०००००० |
| ३. | जाहिरात बोर्ड जागा भाडे | १०००००० | १०००००० | | २०००००० |
| ४. | अन्नभेसळ प्रतिबंधक कायद्यानुसार लायसन्स फी | २००००० | ३००००० | | ५००००० |
| ५. | गाळे भाडे | ९५००००० | ५००००० | | १०००००० |
| ६. | रक्तपेढी पासून उत्पन्न | १८००००० | २००००० | | २०००००० |
| ७. | अनधिकृत बांधकाम नियमानुकूल करणे. | ५०००००० | ५०००००० | | १०००००० |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | **१४९५००००००** | **२३००००००** | **०** | **१७२५०००००** |

| अ.नं | लेखाशिर्ष ( खर्च बाजू) | मा.आयुक्त यांनी सुचविलेली तरतुद | मा.स्थायी सभेने केलेले बदल | | मा.स्थायी समितीने मंजूर केलेली तरतुद |
|---|---|---|---|---|---|
| | | | वाढ | घट | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १. | नवीन संगणक खरेदी ( सर्व विभाग ) | ४१००००० | | १०००००० | ३१००००० |
| २. | १५० वॅट सोडीयम व्हेपर पोल टाकणे / उर्त्जा बचत दिवे बसविणे. | १००००००० | | ४०००००० | ६०००००० |
| ३. | नविन इले. पोल, स्टीट लाईट, स्पॅन फिटींग | १००००००० | | ४०००००० | ६०००००० |
| ४. | मोटार इन्श्युरन्स | ८००००० | २००००० | | १०००००० |
| ५. | वाहन भाडे / प्रतिपूर्ती (इंधना व्यतिरिक्त) | २०००००० | १०००००० | | ३०००००० |
| ६. | रस्ते कॉक्रीटीकरण | १२५००००० | | ३५००००० | ९०००००० |
| ७. | जेसीबी खरेदी / भाडयाने लावणे | ० | २०००००० | | २०००००० |
| ८. | शिक्षक दिन खर्च | ० | २५००० | | २५००० |
| ९. | रस्ते खडीकरण | १००००००० | | ६०००००० | ४०००००० |
| १०. | रस्ते डांबरीकरण व नुतनी करण | १३०००००० | | ५०००००० | ८०००००० |
| ११. | रस्ते मजबुतीकरण | १३०००००० | | ५०००००० | ८०००००० |
| १२. | नविन प्रशासकीय इमारत | १००००००० | | २५००००० | ७५००००० |
| १३. | मा. सदस्य प्रभाग विकास स्वेच्छा निधी | १९४२५००० | ३६५७५००० | | ५६०००००० |
| १४. | भू-संपादन करणे | ४०७५००० | | २०००००० | २०७५००० |
| १५. | महापौर शहर विकास निधी | ० | २००००००० | | २००००००० |
| १६. | उपमहापौर शहर विकास निधी | ० | २५००००० | | २५००००० |
| १७. | स्थायी समिती सभापती शहर विकास निधी | ० | २५००००० | | २५००००० |
| १८. | पुतळे बसविणे | १५००००० | | ५००००० | १०००००० |
| १९. | नविन गटर | ९०००००० | | १५००००० | ७५००००० |
| २०. | नविन ड्रेनेज | ९०००००० | | २०००००० | ७०००००० |
| २१. | शहरात नविन पाईप लाईन टाकणे | ९०००००० | | ४०००००० | ५०००००० |
| २२. | वसुली ( मालमत्ता कर ) रिफंड | १५००००० | | ५००००० | १०००००० |
| २३. | वर्कशॉप स्थलांतर व विकसीत करणे | १५००००० | | १०००००० | ५००००० |
| २४. | वायरमन ( मानधन ) | ० | ७००००० | | ७००००० |
| | | १४०४००००० | ६५५००००० | ४२५००००० | १६३४००००० |

सही /-

**श्री. अविनाश हरिभाऊ घुले**

सभापती,

स्थायी समिती

अहमदनगर महानगरपालिका,